




संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



₹ 3000* पर्यंत डिस्काउंट | ₹12000* पर्यंतचे विशेष फायदे (स्कूटर्सवर) | कमी डाउन पेमेंट ₹ 1999* | निवडक कार्डसवर कॅशबॅक ₹5000*

शुभ मुहूर्त ऑफर्स अनलॉक करण्यासाठी स्कॅन करा

98980 51581






रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. ०३.१०.२०२४ | अंक नं. १८२ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा

उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..

1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध

कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध

सर्व किराणा दुकानात उपलब्ध

स्टॉकिस्ट

अशोक बन्सीलाल पारख

कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर.

(0241) 2343896/2341196


# देवीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या कारने घेतला पेट

## बुऱ्हाणनगर येथील घटना, पोलिसांच्या सतर्कतेने अनर्थ टळला

नगर – शारदीय नवरात्रोत्सवास ३ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली असून, पहिल्याच माळेला बुऱ्हाणनगर येथील पुरातन कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या कारला अचानक आग लागली. त्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते. मात्र तेथे बंदोबस्तासाठी असलेल्या भिंगार कॅम्प पोलिसांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला. या आगीत कारचे मोठे नुकसान झाले.



नवरात्रौत्सवानिमित्त गुरुवारी सकाळी तुळजाभवानी देवीची महापूजा, अभिषेक करून दुपारी १२ वाजता विधीवत घटस्थापना झाली. देवीच्या दर्शनास भाविकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. दुपारी कायनेटिक चौक येथील जयकुमार जीवनलाल मुनोत यांच्या कुटुंबातील सदस्य मारुती कंपनीच्या इग्नीस सीएनजी कारने (क्र. एमएच १३ सीएस २६९९) बुऱ्हाणनगर येथे देवीच्या दर्शनासाठी गेले होते.

कारमधील सदस्य मंदिराकडे दर्शनासाठी गेल्यावर चालकाने ही कार मंदिरापासून काहीशा अंतरावर असलेल्या मंगल कार्यालयाच्या बाजूला उभी केली होती. दुपारी २ वाजण्याच्या सुमारास कारने अचानक मागील बाजूस पेट घेतला. सुरुवातीला धूर आणि नंतर आगीच्या ज्वाला दिसू लागल्या.

तेथे बंदोबस्तासाठी असलेले भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यातील सपोनि. जगदीश मुलगीर, सफौ. अजय नगरे, पोहेकॉ. दत्तात्रय मोरे, अजय गव्हाणे, पोकॉ.अमोल आव्हाड आदींनी तातडीने त्या ठिकाणी धाव घेत नागरिकांना कारपासून दूर पांगविले. महापालिकेच्या अग्निशामक दलानेही तातडीने घटनास्थळी धाव घेत पेटलेल्या कारवर पाण्याचा मारा करत आग विझवली.





समर्थ पेस्ट कंट्रोल

झुरळ, पाल, मुंग्या, कोळी, मच्छर, वाळवी, ढेकुण, उंदीर, मधमाश्या, वाळवी यांच्या त्रासापासून खात्रीशीर मुक्तता तसेच घर, बंगला, दुकाने, गोडावून, ऑफिस, फॅक्टरिज, हॉटेल, पतसंस्था, बँक इ. ठिकाणी पेस्ट कंट्रोल करून मिळेल.

9890692159
9503105050




**श्रीमती रेखा सुभाष चोपडा**

स्वर्गवास दिनांक ३ ऑक्टोबर २०१०

*“परिवार जिसका मंदिर था, स्नेह जिसकी शक्ति थी,*
*परिश्रम जिसका कर्तव्य था, परमार्थ जिसकी भक्ति थी,*
*ऐसी आत्मा को शांति प्रदान करे”*

**१४वा**

**। पुण्यस्मरण ।**

आपल्या आदर्श स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !

शोकाकुल

| | | | |
|---|---|---|---|
| सुधीर चोपडा | सौ. ज्योती चोपडा | विजय बोरा | सौ. वैशाली बोरा |
| निलेश चोपडा | सौ. वैशाली चोपडा | महेंद्र गांधी | सौ. प्रीती गांधी |
| पनालाल शिंगवी | सौ. मनोरमा शिंगवी | सौरभ बोरा | सौ. राखी बोरा |
| विलास मुनोत | सौ. उषा मुनोत | अमित नहार | सौ. पौर्णिमा नहार |
| सचिन बोरा | सौ. मोनाली बोरा | वरूण चोपडा | सौ. किर्ती चोपडा |

तन्मय चोपडा, सौ. श्रेया चोपडा

ईशान, श्लोक, वेद, ध्रुव




जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## अनुभवावीण मान डोलवू नको रे – संत सोहिरोबा

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

हरि भजनावीण काळ घालवू नको रे... हा प्रसिद्ध अभंग अनेकदा अनेकांनी ऐकला असेल, पण हा अभंग संत सोहिरोबांचा आहे हे आपल्याला माहीत नसते.

प्रपंचात राहूनही वैराग्याचा केशरी दीप अष्टौप्रहर तेवत ठेवल्याने गहिनीनाथांनी ज्यांना दृष्टांत दिला, सोहम मंत्र दिला त्या 'अच्युत अंबिये' या गृहस्थाचा सोहिरोबा संत झाला.

अविरत सदा सर्वकाळ, सत्कर्मयोगी विचारवंताची संगत लाभली तर मनात थोडी 'उमज' येऊ शकते. ते म्हणतात, ''संत संगतीने समजा आणुनी मनी पुरती उमज । अनुभवावीण मान डोलवू नको रे ।।''

उगीच कुणीतरी म्हणते म्हणून काहीही न उमजता, कळलंय असं दाखवून मान डोलावण्यात काय अर्थ आहे? स्वतःच स्वतःला किती काळ चकवायचं? अविवेकानं सत्कार्याला ग्लानी का बरं आणायची? आणि आयुष्य सुंदर करणाऱ्या या संधीचा लाभ न घेता, हरिभजनावीणच हे क्षण का बरें घालवायचे?

आज आपले सर्व सुख प्रसारमाध्यमांच्या काचेवरच अडकले आहे. युवक व पालकपिढी विचार, विवेक, भान, जागृती या दृष्टीने अक्षरशः निःसंतान झाली आहे. अशा काळात 'हरी भजनावीण काळ' हा अभंग केवळ मंदिर, कीर्तनात न ठेवता जगण्यात उतरला पाहिजे, उजळला पाहिजे. प्रेमळ व ज्ञानी संताने मायेने समजून सांगितलेले हे 'उपदेशामृत' – वाचन हे निमित्त – त्याचे अनुसरण ही साधना. (प्रविण दवणे)







शहरातील जड वाहतूक तात्काळ बंद करा, या मागणीचे निवेदन जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला तसेच अपअधीक्षक अमोल भारती यांना देताना कल्याण रोडचे नागरिक. (छाया – लहू दळवी)

# शहरातील जड वाहतूक तात्काळ बंद करा

### कल्याण रोड परिसरातील नागरिकांची पोलीस प्रशासनाकडे मागणी; अपघाताची चौकशी करुन वेताळ परिवाराला न्याय द्यावा

नगर – शहरात अनेक रस्त्यांवर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे, त्यामुळे शहरातील अनेक नागरिक, शाळकरी विद्यार्थ्यांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. याच वाहतूक कोंडीमुळे अनेक अपघात होत असून, नुकतेच अवघ्या १२ वर्षाच्या विद्यार्थ्याचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाला असून, त्याच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेने नागरिक हळहळ व्यक्त करत आहे. जिल्हाधिकारी यांचा दिवसा अवजड वाहतूक बंदीचा आदेश असताना या आदेशाला न जुमानता सर्रासपणे शहरात अवजड वाहने रस्त्यावर येत आहेत. शाळेतील विद्यार्थी जीव मुठीत घेऊन रस्त्यांवरुन ये जा करत आहेत. याच वाहतूक कोंडीमुळे व अवजड वाहनांच्या घुसखोरीमुळे अनेक अपघात होऊन निष्पाप जीव जात आहेत. त्यामुळे विविध प्रमुख रस्त्यावरील चौकाचौकात वाहतूक पोलिस असणे आवश्यक व गरजेचे आहे. ते ड्यूटीवर असतील तर निश्चितच वाहतूक सुरळीत होईल आणि अपघात टाळता येईल, अशी मागणी कल्याण रोड परिसरातील नागरिकांनी शहर पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांच्याकडे निवेदनातून केली. यावेळी पारुनाथ ढोकळे, दत्ता गाडळकर, ओंकार शिंदे, पै. महेश लोंढे, ॲड. युवराज शिंदे, भगवान काटे, पंडितराव हराळ, बबन खामकर, रोहिदास दातीर, मदन काशीद, प्रद्युम्न सोनवणे, सुरेंद्र बोऱ्हाडे, राजाराम रोहकले, विनायक आडेप, रितेश आडेप, विश्वास खिलारी, योगेश डेरे, कांतीलाल ढवळे, सचिन येठेकर, हरिभाऊ भोस, सुशीलकुमार नन्नवरे, तेजस पवार, जयवंत ठाणगे, ज्ञानदेव आठरे, गणेश गाडगे, संतोष ठाणगे, ॲड. अभिजित देशमुख, निलेश बाविस्कर, अनंत आढाव, सुखदेव हापसे, ॲड. अभिजित देशमुख, देवेंद्र ढोकळे आदी उपस्थित होते,

निवेदनात पुढे म्हटले की, कल्याण रोड परिसरात सीना नदीवरील पुलाचे काम सुरु आहे. या महामार्गावरुन अनेक अवजड वाहने शहरात प्रवेश करत आहे. त्यामुळे नेप्ती नाका, दिल्लीगेट परिसर, सिद्धीबाग चौक, जुने कोर्ट, आप्पू हत्ती चौक, सिव्हील हॉस्पीटल चौक, वाडिया पार्क, महात्मा गांधी पुतळा चौक या ठिकाणी वाहतूककोंडी प्रचंड प्रमाणात होत आहे कारण याच रस्त्यावर अनेक कार्यालये, शाळा, दुकाने आहेत. त्यामुळे या वर्दळीच्या ठिकाणी वाहतूक पोलीसांची कायमस्वरुपी नेमणूक करावी तसेच अवजड वाहनांना किमान सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत प्रवेश बंदी करावी, त्यामुळे निश्चित वाहतूक व्यवस्था सुरळीत होऊन अपघात टळतील. दोन दिवसांपूर्वी शहरातील बालिकाश्रम रोडवर शाळकरी विद्यार्थी अथर्व वेताळ याचा अपघाती मृत्यू झाला तरी या अपघाताची सविस्तर चौकशी लवकरात लवकर करुन वेताळ परिवाराला न्याय द्यावा, अशी मागणी करत पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्याशी देखील नागरिकांनी चर्चा केली.

#### शहरात अवजड वाहनांना बंदीची प्रभावीपणे अंमलबजावणी करा

अहमदनगर शहरात दिवसेंदिवस रहदारीची समस्या वाढत असून त्यामुळे होणाऱ्या अपघातांमध्ये जीवितहानी होत आहे. शहरात अवजड वाहनांना बंदी असून देखील त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याने महिनाभरात झालेल्या दोन अपघातांमध्ये दोन दुर्दैवी मृत्यूच्या घटना घडलेल्या आहेत. बालिकाश्रम रोड परिसरात रेसिडेन्शिअल हायस्कूलचा विद्यार्थी अथर्व वेताळचा अपघाती वाहनाच्या धडकेने दुर्दैवी मृत्यू झाला. त्या पार्श्वभूमीवर कल्याण रोड परिसरातील नागरिकांनी आज जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले, अशी माहिती दत्ता गाडळकर यांनी दिली.

शहरात दुर्दैवी अपघाती घटना पुन्हा घडू नये म्हणून तात्काळ प्रभावीपणे उपाययोजना कराव्यात, शहरातील सर्व शाळा परिसरांमधील अतिक्रमणे तात्काळ हटविण्यात यावीत तसेच शहरातील अतिवर्दळीच्या शाळा परिसरांमध्ये वाहतूक पोलिसांची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी पारुनाथ ढोकळे यांनी केली.

शहरातील अथर्व वेताळच्या अपघाती निधनाची घटना अतिशय दुर्दैवी व मनाला व्यतीत करणारी असल्याचे सांगून याबाबत तात्काळ प्रभावी उपाययोजना करणार असल्याचे सांगत शाळा परिसरातील अतिक्रमणे हटवणे ही बाब महानगरपालिकेच्या कार्यकक्षेतील असून याबाबत त्यांच्याकडे पाठपुरावा केला जाईल, तसेच अति रहदारी असलेल्या शाळा परिसरांमध्ये तात्काळ वाहतूक शाखेचे पोलीस नियुक्त करण्यात येतील, असे आश्वासन पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांनी दिले.

# सीना नदी खोलीकरण व रुंदीकरणासाठी २० कोटी मंजूर; महापालिकेला पत्र प्राप्त

### आमदार संग्राम जगताप यांची माहिती



नगर – सीना नदीच्या पूररेषेची फेरआखणी, रुंदीकरण व खोलीकरण केल्याशिवाय करता येत नव्हती. तेव्हा आमदार संग्राम जगताप यांनी त्यासाठी लागणाऱ्या निधीकरिता पाठपुरावा केला. त्या पाठपुराव्याला यश येऊन राज्य शासनाच्या १५ व्या वित्त आयोगातून आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन योजनेअंतर्गत २० कोटी ६६ रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसे पत्र अहमदनगर महापालिकेला ऐन नवरात्रीच्या प्रारंभीच प्राप्त झाल्याची माहिती आमदार संग्राम जगताप यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

नगर शहराच्या सीमेला लागून सीना नदी वाहते. नगर शहराभोवती तिची लांबी सुमारे १४ किलोमीटर आहे. परंतु सीना नदीच्या काठाने मानवी वस्त्या वाढत गेल्या तसेच नदीकाठच्या जमीनधारकांनी अतिक्रमणही केले आणि नदीचे पात्र आकसत गेले. त्यातून नदीला एखाद्या ओढ्याचे स्वरूप प्राप्त झाले. कधी तरी सरासरी पेक्षा जास्त पाऊस पडला की सीना नदीला पूर येतो. पाऊस जास्त झाला की आजूबाजूच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरते व तेथील रहिवाशांची त्रेधातिरपीट उडते. यंदाच्या पावसाळ्यातही तशी परिस्थिती उद्भवली होती. वारंवार होणारी ही स्थिती व नागरिकांचे हाल टाळण्यासाठी सीना नदीची पूररेषा आखून नियोजन करणे आवश्यक होते. त्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी नगर महापालिका व जिल्हाधिकारी यांच्यासह २०२३ मध्ये संयुक्त बैठक घेतली होती. त्या बैठकीत सांगोपांग चर्चाही झाली. आमदार जगताप यांनी महसूल व वनविभागाच्या अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाकडे याबाब कैफीयत मांडली. या विभागाने राज्याच्या जलसंपदा विभागाकडे याबाबत मत मागविले होते. जलसंपदा विभागाने पूररेषेची फेरआखणी करण्यासाठी काय करावे लागणार, याबाबत सूचना केल्या. सीना नदीचे रुंदीकरण व खोलीकरण अगोदर करायला हवे तरच पूररेषेची आखणी करता येईल, असे या विभागाने सांगितले. या नदीवर शहर व शहराजवळ असलेल्या पुलांच्या लांबीरुंदीचे गणितही पाहणे गरजेचे आहे, अशी माहिती त्यात दिली.

सीना नदीची मूळ वहनक्षमता पुनर्स्थापित करावयाची असल्यास नदीपात्रात साचलेला गाळ काढणे, अतिक्रमण काढणे, गरजेचे आहे. काढलेला गाळ नदीकिनारी टाकून नगर शहराचे सुशोभिकरण करता येईल असे महापालिकेने म्हटले होते. त्यावरून किनारी रस्ता (कोस्टल रोड) तयार करता येऊ शकतो. त्यातून नदीचे मूळ पात्र पुनर्स्थापित होऊन त्या पात्रात पाऊस व अन्य पाण्याचा विसर्ग किती बसू शकतो, हे लक्षात येईल. त्यासाठी महापालिकेच्या हद्दीतील १० किलोमीटर लांब नदीचे खोलीकरण व रुंदीकरण होणे अत्यंत गरजेचे असल्याचे महापालिकेने म्हटले होते. तशी शहराभोवतालची नदीची लांबी १४ किलोमीटर आहे. या भागात तिची प्रस्तावित रुंदी २० ते ३० मीटर व प्रस्तावित खोली चार मीटर आहे. पूर्वी ०९.७० किलोमीटर लांबीचे काम झाले असले तरी उर्वरीत पुरे करावयाचे आहे.

नदीचे रुंदीकरण व खोलीकरणासंदर्भात प्रकल्प मूल्यमापन समिती, राज्य कार्यकारी समिती, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, तांत्रिक मूल्यमापन समिती यांच्या बैठका झाल्या. दिल्लीतील आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचना आदींचा विचार करून १५ व्या वित्त आयोगामार्फ आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन योजनेअंतर्गत सीना नदीचे खोलीकरण व रुंदीकरण तसेच भिंगार नाल्याचेही खोलीकरण व रुंदीकरण या कामांसाठी २० कोटी ६६ रुपये मंजूर करण्यात आले आहेत. आमदार संग्राम जगताप यांनी वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

#### पूर नियंत्रण निळ्या व लाल रेषेचा विषय मार्गी

नागपूर, बोल्हेगाव, सावेडी, बालिकाश्रम रोड, नालेगाव, ठागणे मळा, काटवण खंडोबा रोड, स्टेशन भाग, पुणे महामार्ग, फुलसौंदर मळा, बाबर मळा या भागात पूर नियंत्रण रेषेचा विषय माग लागत नव्हता. परंतु, आमदार संग्राम जगताप यांच्या अथक प्रयत्नानंतर सीना नदी लगत असलेल्या पूर नियंत्रण निळ्या व लाल रेषेचा विषय माग लागला आहे. त्यामुळे जागा मालकांना आता जागा डेव्हलप करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## मिरावली पहाडवर जाण्यासाठी तारकपूर येथून बस सोडाव्यात

नगर – सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेले हजरत मिरावली शहेनशहा बाबा येथे जाण्यासाठी तारकपूर बस स्टॅन्ड वरुन पाच एस. टी. बसेस सोडाव्यात अशी मागणी भूमी अभिलेख कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे जिल्हाध्यक्ष आरिफ शेख यांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सर्व धर्मीय श्रद्धास्थान असणारे मिरावली शहंशाह अहमदनगर दर्गा पर्यंत जाण्यासाठी एस.टी. बस उपलब्ध नाही. गोरगरीब भाविक लोकांना इतर साधने परवडत नाही खूप जास्त पैसे घेतात त्यामुळे गोरगरीब जनतेसाठी भाविकांसाठी तारकपूर बस डेपो येथून दररोज मिरावली शहंशाह दर्गा पर्यंत पाच एस.टी. बसेस सोडाव्यात आणि पुन्हा तारकपूर डेपो मध्ये एस.टी. सोडावी. त्यामुळे एस.टी. महामंडळाच्या उत्पन्नात देखील वाढ होईल, असे शेख यांच्यासह कास्ट्राईब कल्याण महासंघाचे केंद्रीय अध्यक्ष एन. एम. पवळे, उपाध्यक्ष वसंत थोरात यांनी म्हटले आहे.

## श्रीधर लोखंडे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – केडगाव येथील रहिवाशी श्रीधर (नाना) भाऊसाहेब लोखंडे (वय ८०) यांचे २ ऑक्टोबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## सुभद्राबाई जपकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – नेप्ती येथील खळगा वस्तीवर राहणाऱ्या सुभद्राबाई लक्ष्मण जपकर (वय ७५) यांचे २ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नेप्ती गावातील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे एक मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अंकुश जपकर यांच्या त्या मातोश्री होत.

## संतोष गुगळे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – करंजी (ता.पाथर्डी) येथील रहिवाशी संतोष मोतीलाल गुगळे (वय ५७) यांचे ३ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर करंजी येथील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पाथर्डी येथील आडते दुकानचे ते संचालक होते. तेजस व ओजेस यांचे ते वडिल तर प्रविण गुगळे यांचे ते मोठे बंधू होत. तसेच सुनंदाजी म.सा. व शुभदाजी यांचे ते बंधू होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# मंदिर, गुरुद्वारा परिसरात घाणींचे 'साम्राज्य' महापालिका प्रशासनाचे मात्र नेहमीच 'दुर्लक्ष'

### घंटागाड्या येत नसल्याने गोविंदपुरात कचऱ्याचे ढिगारे, तरीही महानगरपालिकेला मिळालीत कोटीची बक्षिसे



गोविंदपुरा परिसरातील साचलेले कचऱ्याचे ढिगारे.

नगर – विविध स्वच्छता स्पर्धा आणि अभियानात अनेकदा विजेतेपद मिळवत कोटीच्या कोटीची बक्षिसे मिळवणाऱ्या महापालिकेच्या कारभाराची प्रत्यक्ष जमिनीवरील हकिगत मात्र काही वेगळीच आहे. शहरातील गोविंदपुरा भागात दररोज मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिगारे साचत असून मंदिर, गुरुद्वारा परिसरात त्यामुळे मोठ्या प्रमाणात अस्वच्छता पसरलेली आहे. दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. याबाबत महापालिका प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन परिसरात कचरा वाहतूक करणाऱ्या घंटागाड्या नियमित सुरु ठेवण्याबाबत आदेश द्यावेत, अशी मागणी होत आहे.

प्रभाग क्र. ३ मधील गोविंदपुरा परिसरातील हनुमान मंदिर परिसर आणि गुरुद्वारा चौकात रिकाम्या जागेवर नागरिक कचरा आणून टाकतात. त्यामुळे या परिसरात नेहमीच कचऱ्याचे ढिगारे लागलेले असतात. या भागात घंटागाड्या नियमित येत नसल्याने कचऱ्याचे व्यवस्थित संकलन होत नाही. नागरिक प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये कचरा भरून हनुमान मंदिर आणि गुरुद्वारा चौक परिसरातील मोकळ्या जागेत टाकतात. सदर कचऱ्याचे ढिगारे तीन–चार दिवस उचलले जात नाहीत. त्यामुळे कचरा रस्त्यावर विखुरला जातो. त्यामुळे सर्वत्र अस्वच्छता, दुर्गंधी आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. परिसरातील नागरिकांचे आरोग्य त्यामुळे धोक्यात आले आहे. मंदिर, गुरुद्वारामध्ये दररोज शेकडो भाविक येतात. या अस्वच्छतेचा त्यांना त्रास सहन करावा लागत आहे. मंदिर असो वा गुरुद्वारा त्याचे धार्मिक पावित्र्य राखण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आणि त्याचबरोबर प्रशासनाचीही आहे. त्यामुळे या परिसरात महापालिका प्रशासनाने दररोज घंटागाडी पाठवावी, साफसफाईचे काम नियमित करून रोजच्या रोज कचऱ्याचे ढिगारे उचलावेत, अशी मागणी स्थायी समितीचे माजी सभापती संजय गाडे पाटील यांनी केली आहे.

परिसरातील अस्वच्छतेबाबत नागरिक वारंवार तक्रारी करतात मात्र त्याची दखल घेतली जात नाही. मी स्वतः प्रभाग अधिकाऱ्यांना दहावेळा सांगितले मात्र दखल घेतली गेली नाही. त्यामुळे महापालिकेने स्वच्छतेत कितीही बक्षिसे मिळवली तरी प्रत्यक्षात स्वच्छता होते का? असा सवाल करत आयुक्तांनी एकदा प्रभाग ३ मध्ये फेरफटका मारावा आणि प्रत्यक्ष पाहणी करावी. स्वच्छतेचा कसा बोजवारा उडालेला आहे हे त्यांच्या लक्षात येईल, असे गाडे पा. यांनी म्हटले आहे.

## चाकूने वार करत युवकाचा खून

### पळून चाललेल्या आरोपीला बायपास रोडवर पोलिसांनी पकडले; गुन्हा दाखल

नगर – बिगारी काम करणार्या परप्रांतीय युवकाच्या पोटात चाकूने वार करून त्याचा खून केल्याची घटना तपोवन रस्त्यावरील ढवण वस्तीवर मंगळवारी (दि.१) रात्री साडेनऊच्या सुमारास घडली. अमन हरिश्चंद्र सतनामी (वय २१, मूळ रा. सतनाम चौक, वॉर्ड नंबर ९, बलोदाबाजार, छत्तीसगड, हल्ली रा. सद्गुरू टॉवर, सुनील ढवण यांच्या विटभट्टीजवळ, तपोवन रस्ता, सावेडी) असे मयत युवकाचे नाव आहे.

या प्रकरणी खुनी परप्रांतीय युवक मनीष उर्फ पुकु तिरथ निशाद (मूळ रा. छत्तीसगड, हल्ली रा. तपोवन रस्ता) याच्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. हेमंत रमेश भारव्दाज (वय २४, मूळ रा. छत्तीसगड, हल्ली रा. तपोवन रस्ता) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे कुटुंबासह सुनील ढवण यांच्या विटभट्टी जवळ राहतात. त्यांच्या शेजारील खोलीत त्यांचा आत्याचा मुलगा अमन हरिश्चंद्र सतनामी तसेच दुसर्या खोलीत रामजी बलवंत निशाद व त्यांचा नातू मनीष उर्फ पुकु तिरथ निशाद हे राहतात. ते सर्वजण बिगारी काम करतात. मंगळवारी रात्री साडेनऊच्या सुमारास फिर्यादी व त्यांच्या घरातील सर्व जण जेवण करून घराबाहेर बसलेले होते. त्यावेळी शेजारी राहणारा मनीष निशाद मोठ मोठ्याने शिवीगाळ करत होता. त्यामुळे फिर्यादीच्या आत्याचा मुलगा अमन हा मनीष याला 'तू मोठ्याने शिवीगाळ करू नकोस, आमच्या घरात महिला आहेत' असे म्हणाला.

त्याने अमन यांना देखील शिवीगाळ केले व घरात जावून चाकू आणला व तो अमन यांच्या पोटात मारून त्यांना जखमी केले. सदरची घटना घडल्यानंतर मनीष हा जवळच असलेल्या ऊसातून पळून गेला. जखमी अमन यांना फिर्यादी व त्यांच्या नातेवाईकांनी सावेडीतील खासगी रूग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार सुरू केले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान, घटनेची माहिती तोफखाना पोलिसांना मिळाल्यानंतर नगर शहर पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. खूनी मनीषचा शोध घेतला असता तो शेंडी बायपास जवळ मिळून आल्याने त्याला ताब्यात घेत त्याच्याविरूध्द खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक कोकरे अधिक तपास करत आहेत.

# शेतीमाल वाहतुकीसाठी किसान रेल सुरू करावी

### मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ७ ऑक्टोबरला ठिय्या आंदोलन

नगर – अहमदनगर, पुणे, सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात फळे, फुले व भाजीपाला पिकतो. परंतु किसान रेल बंद आहेत व प्रवाशी जलद रेल्वे गाड्यांमध्ये अपुरी जागा असल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. नुकसान टाळण्यासाठी या मार्गावर किसान रेल सुरू करावी या मागणीसाठी स्वतंत्र भारत पक्ष, जन संसद संघटना व पीपल्स हेल्पलाईन या सामाजिक संघटना ७ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करणार असल्याची माहिती स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांचा नाशिवंत शेतीमाल लवकरात लवकर व कमी खर्चात देशातील इतर बाजार पेठेत पोहोचवता यावा म्हणून केंद्र शासनाने अनेक किसान रेल सुरू केल्या होत्या. शेतकऱ्यांना त्याचा फायदा होता होता. मात्र सरकारने बऱ्याच किसान रेल बंद केल्या आहेत. महाराष्ट्रातून उत्तर भारतात व पूर्वेकडच्या राज्यांमध्ये जाणाऱ्या जलद प्रवासी गाड्यांमध्ये फक्त आर्धा डबा (बोगी) पार्सल साठी असतो. मोठ्या शहरातून सुटणाऱ्या गाड्यांमध्ये आगोदरच औद्योगिक कारखान्यांचा स्टील, लोखंडाचा माल, गाड्यांचे सुटे भाग भरले जातात. पुढील स्टेशनवर येणारा शेतमाल चढविण्यासाठी जागा रहात नाही. या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचा माल पाठवला जात नाही व खराब होऊन जातो.

पार्सलच्या डब्यात जागा कमी आल्यामुळे माल चाढवणारे ठेकेदार, प्राधान्य देण्यासाठी शेतकऱ्यांकडून अव्वाचे सव्वा हमाली वसूल करतात.

रेल्वे मंत्रालयाने बंद केलेल्या किसान रेल सुरू कराव्यात, गरज असेल तेथे नवीन किसान रेल सुरू कराव्यात. जेथे किसान रेलची सुविधा नाही तेथे प्रत्येक जलद प्रवासी गाडीला एक स्वतंत्र बोगी फक्त शेतीमालासाठी जोडण्याची व्यवस्था करावी या मागणीसाठी ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजे पासून सायं. ४ वाजे पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय ठिय्या आंदोलन करणार आहोत. या आंदोलनास शेतकऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन आंदोलनाच्या नेत्यांनी केले आहे. हे आंदोलन अनिल घनवट, भारतीय जन संसदेचे नेते अशोक सब्बान व पीपल्स हेल्पलाईनचे नेते ॲड. कारभारी गवळी यांच्या नेतृत्वाखाली हे ठिय्या आंदोलन करण्यात येईल.

# गृहिणी

## आरोग्य

### जंकफूड धोकादायक

जंकफूड हे हृदयासाठी धोकादायक आहे. जास्त तळलेले, भाजलेले पदार्थ खाणंही आरोग्यासाठी नुकसानकारक आहे. प्रोसेस्ड मिटमध्येही मिटला फ्रेश ठेवण्यासाठी अनेक गोष्टींचा समावेश केला जातो, जे हृदयासाठी धोकादायक आहे.

## नवरात्रोत्सव उपवास स्पेशल पाककला

### शेंगदाण्याचा म्हैसूर

**साहित्य :** शेंगाच्या दाण्यांचे कूट दीड वाटी, साखर एक वाटी, तूप तीन वाट्या.

**कृती :** शेंगदाणे बेताचे भाजून व साल काढून, दाण्याचे कूट करण्याच्या यंत्राने कूट करून घ्यावे. साखरेचा एक तारी पाक करावा. तूप गरम करत ठेवावे. ते चांगले कडकडीत करावे. साखरेच्या पाकात दाण्याचे कूट घालून हलवून सारखे करून घ्यावे. नंतर कूट घातलेल्या पाकात, तो पाक विस्तवावर असतानाच, पळीपळी कडकडीत तूप घालावे. याप्रमाणे सर्व तूप घालावे. नंतर त्या दाण्यांच्या कुटाला जाळी पडू लागते. जाळी पडू लागली, की ते मिश्रण एका थाळीत ओतावे. साधारण एक इंच जाड होईल, इतके जाड ओतावे. नंतर वड्या कापून, थाळी तिरकी करून ठेवावी, म्हणजे तूप निथळून बाहेर येईल.

## वास्तू

### देवाच्या मूर्ती व देवत्त्व

* आजकाल भेटवस्तू म्हणून देवाची मूर्ती अथवा प्रतिमा देण्याची प्रथा वाढीस लागली आहे. कृपया ती थांबवावी. शोकेसमध्ये ठेवलेल्या मूर्तींची जरी पूजा नाही केली तरी त्यातील देवत्व आपण स्वीकारतो व त्या अशा प्रकारे सर्वत्र मांडून ठेवणे योग्य नाही.
* उत्तर पूर्व भागाव्यतिरिक्त घरात अन्यत्र कुठेही देवाचे फोटो, प्रतिमा अथवा स्टिकर्स लावू नये.
* देवांच्या मूर्ती स्वच्छ करताना सिड क्षारयुक्त पदार्थ वापरू नये.

## सल्ला

तिळाची अगर कोरट्याची चटणी करताना त्यात आपण कढीलिंबाचा पाला घालतो. त्याऐवजी आवडत असेल, तर पुदिन्याचा पाला तेलावर परतून घालावा. पुदिन्याचा स्वाद चांगला लागतो.

## सौंदर्य

उभट चेहरा असणाऱ्यांनी केस घट्ट आवळून कधीच केशभूषा करू नये. उलट चेहऱ्याच्या दोन्ही बाजूंनी केस येतील अशी सैलसर केशरचना करावी. मानेपर्यंत कापलेले मोकळे केसही अशांना चांगले दिसतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ४ ऑक्टोबर २०२४

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, चित्रा १८।३८, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. ३० मि.**

### राशिभविष्य

**मेष :** दिवस चांगला जाईल. महत्त्वाच्या कार्यात हितचिंतकांकडून मदत मिळेल. वाहनपिडा संभवते.

**वृषभ :** जुने मित्र भेटतील. कलाक्षेत्रातील व्यक्तींच्या कामात स्थिती सुखद राहील. नवीन करार होतील. आरोग्य उत्तम राहील.

**मिथुन :** व्यावसायिक अडचणी सतावतील. पितृचिंता जाणवेल. आरोग्याच्या दृष्टीने काळ अनुकूल आहे.

**कर्क :** कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील. मानसन्मानात वाढ होईल. हितशत्रू व भाऊबंद डोके वर काढतील.

**सिंह :** धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल व सन्मान वाढेल. वडीलधाऱ्यांकडून प्रशंसा होईल.

**कन्या :** राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. भातृचिंता सतावेल. वाहनपिडेचा संभव आहे.

**तूळ :** न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील.

**वृश्चिक :** दिवस आनंदात जाईल. मानसन्मानात वाढ होईल. कौटुंबिक वातावरण अत्यंत उत्तम राहिल.

**धनु :** पूर्वीपासून आपल्या मनातील असलेले संकल्प पूर्ण होतील. जुने मित्र भेटल्याने दिवस आनंदात जाईल.

**मकर :** आपण आपल्या घरासाठी मोठी खरेदी करू शकता. आजचा दिवस जोमदार ठरेल. भावांचे सहकार्य लाभेल.

**कुंभ :** राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. नवीन वास्तू व वाहन घेण्यासाठी उत्तम दिवस.

**मीन :** वाहने खराब होण्याची शाक्यता आहे. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील. भातृचिंता सतावेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## हसा आणि शतायुषी व्हा!

वडील : मोठी झाल्यावर काय करशील?
मुलगी : लग्न...
वडील : चुकीची बाब...आतापासून कोणाबद्दल असले वाईट विचार ठेवू नये...

## ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

* टोमी लुईसच्या विमानाचे ज्याने भाडे दिले होते तो होता मेयर ए. सी. फील व तो पिटस्बर्गचा रहिवासी होता. त्याने लिलावातून ४०० डॉलर्स देवून विमानाचे पहिले तिकीट खरेदी केले.
* युरोपातील नित्य विमान सेवा ही जर्मनीने बहाल केली. डाऊस लुफ्तासा असे त्या सेवेचे नाव होते.

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## फिल्मीचक्कर क्र. ११५७ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ४ | | ■ |
| | ■ | | ■ | ५ | | ■ | ६ |
| ७ | | ■ | ■ | | ■ | ■ | |
| | ■ | ८ | ■ | ९ | | १० | |
| ११ | | | ■ | | ■ | | ■ |
| | ■ | १२ | १३ | | ■ | १४ | १५ |
| | ■ | १६ | | | ■ | १७ | |
| ■ | १८ | | ■ | १९ | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) धर्मेंद्र, सनी देओल, पूनम ढिल्लन यांचा एक चित्रपट ५) ++ पाटेकर (अभिनेता) ७) ++ धुपिया (अभिनेत्री) ९) दिवंगत अभिनेते अशोककुमार यांचे टोपणनाव ११) गंगा +++ (चित्रपटाचे नाव) १२) +++ गौरव ('लव स्टोरी' चित्रपटाचा नायक) १४) छोटीसी उमर मे लग गया रोग कहते हैं लोक के मै ++ जाऊंगी (गाणे) १६) ऐ +++ तेरे बंदे हम (गाणे) १७) प्यार की ++ (चित्रपटाचे नाव) १८) ++ बाहों मे (चित्रपटाचे नाव) १९) ++ मुराद (अभिनेता)

**उभे शब्द :-** १) राहुल रॉय, करिश्मा कपूर, जॅकी श्रॉफ, डिंपल कापडिया यांचा एक चित्रपट २) 'सावन भादो' चित्रपटाची नायिका ३) 'बिदाई, मनचली' आदी चित्रपटांची नायिका ४) ठंडे ठंडे पानी से नहाना चाहीए ++ आये या न आये गाना चाहीए (गाणे) ६) +++ महिवाल (चित्रपटाचे नाव) ८) 'पत्थर के सनम' चित्रपटाची दिवंगत नायिका १०) देव आनंद, नलिनी जयवंत यांचा एक चित्रपट १३) एक फूल दो ++ (चित्रपटाचे नाव) १५) रंगीला +++ (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** धैर्य म्हणजे संतोषाची कुपी आहे.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### घामाला वास का येतो? घामाचे डाग कपड्यावर का पडतात?

घामात पाण्याखेरीज असणारा महत्त्वाचा घटक म्हणजे सोडियम क्लोराईड हा क्षार. याखेरीज इतर टाकाऊ पदार्थही असतात. कपडे घामाने भिजल्यानंतर कालांतराने घामातील पाण्याचे बाष्पीभवन होते व कपड्यावर क्षार तसेच इतर उत्सर्जित पदार्थ यामुळे डाग पडतात. सामान्यपणे घामाला कोणत्याही प्रकारचा वास नसतो. काखेतील घामाचा विशिष्ट प्रकारचा वास येतो. विशेषतः बस, लोकल अशा खूप गर्दीच्या ठिकाणी हे वास प्रकर्षाने जाणवतात. घामाला वास नसला तरी काख व शरीराच्या इतर भागातील घामाला तेथे जंतूसंसर्ग झाल्याने वास येतो.

उन्हाळ्याच्या दिवसात थंड पाण्याने दिवसातून दोनदा तरी स्नान करावे, म्हणजे शरीराची स्वच्छता नीट राखता येईल.

साधारणतः टाल्कम पावडरचा वापर केल्यास घाम येण्याचे प्रमाण कमी होईल. घामोळ्या झाल्या असतील तर औषधीयुक्त पावडरी वापराव्यात. असे उपाय केल्यास घाम जास्त येणार नाही व आला तरी योग्य ती स्वच्छता राखली गेल्याने त्याला वास येणार नाही.

## शिकवण साधूची

एका गावाच्या भोवती जंगल होतं. त्या जंगलातून एक पायवाट शहराकडे जात होती. बाजारहाट किंवा राजाच्या दरबारी नोकरीस जाताना गावकऱ्यांना याच पायवाटेवरून जावे लागे.

काही दिवसांनी अतिशय विषारी व मोठा नागराज त्या जंगलातील पायवाटेवर आडवा पडून राहू लागला. त्याने अनेकांना दंश केला. बरीच माणसं दगावली, त्यामुळे त्या नागराजाबद्दलची दहशत वाढली.

एक साधू त्या पायवाटेवरून निघाला असता, त्याला त्या नागराजाने दंश केला. तरी तो साधू उभाच! म्हणून पुन्हा त्या नागराजाने कडकडून दंश केला. तरी साधूवर काही परिणाम झाला नाही. साधू त्याला म्हणाला, 'अरे तू निष्कारण दंश करून कित्येकांना ठार केलेस, जन्म माणसाचा असो की सर्पाचा. पाप पदरी पडतेच. तुझ्या खाती किती पाप जमा झाले असेल याचा कधी विचार केला आहेस का?'

'मग मी काय करू महाराज?'

'तू आजपासून दंश करायचे सोडून दे. उंबराची फळं भक्षण कर व देवाचे नामस्मरण करत त्याच उंबर वृक्षाखाली रहा. ही पायवाट मोकळी कर.' साधूचे ऐकून नागराज उंबराच्या झाडाखाली गेला व पिकलेली सुंदर फळे खाऊन 'हरी हरी' मंत्रजप करीत राहिला. साधूने गावात जाऊन आजपासून नागराजाने पायवाट मोकळी केली व त्याने दंश करण्याचे सोडल्याचे सर्वांना सांगितले.

(क्रमशः)

## जीवन चक्र – मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



### २. जीवन की रोशनी

सभी प्रकार के मन पसंद और नापसन्द, मान, ईर्ष्या, द्वेष, प्यार, घृणा आदि अचेतन तौर पर हमारी चेतनता, व्यक्तिगत चेतनता के अन्दर आती रहती हैं और हमें जीवन के अन्तिम लक्ष्य या उद्देश्य अर्थात् आत्मानुभव से दूर किये रखती है। जीव के असली उद्देश्य की अज्ञानता हमारा सबसे बड़ा रोग है और आत्मा का दुखों और पापों से भरी हुई दुनिया के अधीन हो जाने का कारण है। फिर भी हमारे अन्तर एक शक्ति है जो आत्मा को दोबारा जीवन दे सकती है। इसलिए हमें भाग-दौड़ के तेज़ गतिशील संसार से वापिस आकर मनुष्य तन के अन्तर ही स्थित अपने (शान्त केन्द्र) को ढूंढना है जहाँ कि परमात्मा की सर्वव्यापक और सदा मुक्त शक्ति निवास करती है। यह शरीर सचमुच ही हरिमन्दिर है जहाँ हरि बसता है। इसलिए वर्तमान प्रणाली को उलटा कर इसे दूसरी दिशा में लगाना होगा। ऐमरसन ने इसको tapping inside और fox-hole में जाना कहा है। इसी तरह राष्ट्रपति ट्रुमन ने एक बार ऐसा ही कहा था क्योंकि जब वह उपने ऊँचे पद की ज़िम्मेदारी के भार से आराम पाना और दोबारा तगड़ा होना चाहता था तो इसी fox-hole में चला जाता था। वेद इसे ब्ररेन्द्र वह छिद्र जिसके द्वारा ब्रह्म जाए, कहते हैं।

दरवाजा खटखटाओ और यह तेरे लिए खोला जाएगा।

(बाईबल)

इससे सिद्ध होता है कि हमारे अन्तर एक दरवाजा है जो उस पार प्रभु की बादशाहत की ओर खुलता है। इसी बारे में कहा गया है- जीवन की ओर जाता मार्ग और इसमें प्रवेश पाने के लिए लगा दरवाजा बड़ा संकरा है। कोई कोई हैं जिन्हें यह मिलता है।

पूर्ण विश्वास के लिए इस द्वार को ढूंढना और इसमें प्रवेश का निजी अनुभव होना आवश्यक है क्योंकि जब तक कोई चीज हमारे निजी अनुभव में नहीं आती यथार्थ नहीं बन सकती। बुद्धि और इस पर निर्भर विचार विमर्श भी सीमित हैं। धर्म ग्रन्थ इसकी चर्चा करते हैं परन्तु इसका अमली अनुभव नहीं करवा सकते, सच्चाई का सम्पर्क देना तो कहीं दूर की बात है। तर्क द्वारा प्राप्त किया हुआ ज्ञान केवल अनुमान मात्र है, इस पर पूरा विश्वास नहीं किया जा सकता।

विश्वास तब आता है जब अंतर में शब्द सुनाई देता है। महान दार्शनिक हैनरी बरगशन कहते हैं, सच्चाई को खोजने का सबसे आसान और विश्वसनीय मार्ग तब मिलता है जब इधर से हटकर उस ओर कूद जाओ। बोध और दलील केवल बुद्धि के स्तर पर समझने में हमारी सहायता कर सकते हैं परन्तु दिव्य दृष्टि या अन्तर की आँख खुलने पर ही असल विश्वास आता है। बहुत से लोग इस दरवाज़ या रास्ते के बारे में अनजान है।

गुरु नानक देव जी जोर देकर फरमाते हैं:-
अन्धे से न आखीयनि जिन
मुखि लोइण नाहि ।।
अन्धे सेई नानका जो खरमुह घुथे जाहि ।।
(राम कली)

वह जीवन जो सदैव है और जो शारीरिक जीवन से भिन्न आत्मा का जीवन है, की ओर ले जाने वाले सँकरे द्वार या तंग गली को ढूंढने के लिए ज़रूरी है कि हम इस वक्त नीचे और बाहरी फैलाव की ओर ले जाने वाले जीवन से उलट कर मन की वृत्तियों को आँखों के पीछे

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

### २. अपने आप से प्रेम करना

परिवार के सबसे छोटे सदस्य से आरंभ करें। एक स्टार शीट लें और उस पर उसकी फोटो लगाएँ। स्टार का चेहरा परिवार की ओर हो। परिवार का हर सदस्य उस स्टार की खूबियों के बारे में बात करे। स्टार की खूबियाँ जताने के लिए एक कहानी सुनाएँ ।

परिवार के सदस्यों द्वारा बताई गई खुबियों को स्टार शीट पर लिखें। उन्हें स्टार के कोनों पर इस तरह लिखें अच्छा कथावाचक सभी व्यक्तियों से कहें कि वे अपनी स्टार शीट घर ले जाकर कहीं चिपका दें, ताकि उन्हें अपनी विशेषताएँ लिखी दिखाई देती रहें।

१.३ पारिवारिक कार्यशाला की समाप्ति

हलका संगीत चलाकर सभी से कहें कि वे कुछ क्षण मौन रखें।

हम इन अद्भुत गतिविधियों को पूरा करने के बाद यहाँ मौन भाव से बैठे हैं हमें अनुभव हो रहा है कि हम अपने परिवार से संबद्ध होने के कारण कितने भाग्यशाली हैं। (विश्राम) हम सबके भीतर सुंदर आंतरिक विशेषताएँ हैं। हम पूरी तरह सकारात्मक व नेक हैं। (विश्राम) जब हम इन विशेषताओं का अभ्यास करते हुए इनके साथ जीते हैं तो वे हमारे तथा संसार के लिए उपहार के समान हो जाते हैं (विश्राम) हमारे विचारों तथा भावनाओं को भी अच्छाई से भरपूर होना चाहिए।

भाग-२ : अपनी विशेषताओं के साथ जीना

सामग्री

१. सीडी प्लेयर तथा ध्यानपरक संगीत का ऑडियो।

२. सभी प्रतिभागियों के लिए सोल रिफ्रेश शीट की प्रतियाँ। ३. सद्गुण कार्ड्स।

सत्रों की अवधि : दो घंटे

२.१ कुछ करना व एक साथ होना। (६० मिनट)

२.१.१ सत्र के आरंभ में।

भाग लेनेवाले परिवारों का स्वागत तथा परिवार में सामंजस्य का सह-निर्माण। कार्यशाला के दूसरे सत्र का आरंभ।

२.१.२ पिछले सप्ताह पर एक नजर।

(अ) हलका संगीत चलाएँ, ताकि वे मौन भाव से पिछले सप्ताह अपने परिवार के साथ की गई गतिविधियों के अनुभवों को एक बार फिर से ताजा कर सकें।

मैं यहाँ बैठकर पिछले सप्ताह के अनुभव को देख रहा हूँ। पिछले सप्ताह की कार्यशाला के बाद मुझमें और मेरे परिवार में कौन से सकारात्मक बदलाव आए हैं?

(विश्राम) मैं अपने परिवार से संबंध रखते हुए इन विशेषताओं से संबंध कैसे रखता हूँ? (विश्राम) मैं अपने परिवार का मानसिक चित्रण करता हूँ-प्यार व स्नेह से भरपूर एक शांतिदायक वातावरण तथा सामंजस्य-युक्त संबंध। (विश्राम) मैं अपने आपसे और अपने परिवार से प्यार करता हूँ। मुझे यह जानकर प्रसन्नता है कि मैं इस अद्भुत परिवार का सदस्य हूँ।

अब सभी से कहें कि पिछले सप्ताह की गतिविधियों से प्राप्त सकारात्मक अनुभवों को सुनाएँ।

२.१.३ सोल रिफ्रेश का परिचय

सबको बताएँ, ऐसा इसलिए किया जा रहा है, ताकि हमारे परिवार को पूरे सप्ताह तक जीवन के लिए तीन प्रमुख मूल्य दिए जा सकें। गुण हमारे जीवन व संबंधों को मधुर, गंध-युक्त एवं आनंदमयी बनाते हैं। जब हम अपने जीवन को सकारात्मक गुणों के साथ जीते हैं तो हमारा जीवन बाधाओं से रहित हो जाता है। समस्याओं व बहानों को समाधानों में बदलते देर नहीं लगती। हमें अपने व्यावहारिक जीवन में भी इन गुणों को उतारना चाहिए।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

### एड्स : मनोबल वाढवा

औषधोपचारांनी फरक पडत नव्हता. तिच्या नातेवाईकांनी एक वर्षापूर्वी तिच्या पतीचे आजाराने निधन झाल्याचे सांगितले. तिच्या काही रक्ताच्या तपासण्या केल्या. त्यामध्ये एचआयव्हीची तपासणी केली. रक्त तपासणीमध्ये तिला एचआयव्हीची लागण झालेली आहे, असे निदान झाले. तिच्या नातेवाईकांना धक्काच बसला. ''बहुतेक पतीकडूनच तिला लागण झाली असेल'', असे त्यांनी सांगितले. ती खूप हुशार मुलगी होती. बारावीला ८२% मार्क पडले होते. पुढे डीएड करून शिक्षिका व्हायचे होते. परंतु शिक्षण चालू असतानाच मोठ्या शहरातील चांगले स्थळ आले, म्हणून घरच्यांनी लग्न करून टाकले.

लग्नानंतर वर्षभरातच तिच्या पतीचे निधन झाले. पतीच्या निधनामुळे खचून गेलेली ती स्त्री एचआयव्हीची लागण झाल्याने अजूनच खचून गेली. माझ्या समोरच घरच्यांवर त्रागा करू लागली. आधुनिक उपचारांमध्ये CD4 - CD8 पेशींची संख्या बघून रुग्णाला अँटिरेट्रोव्हायरल उपचार सुरू करतात.

आयुर्वेदीय पंचकर्म चिकित्सेमध्ये रुग्णाचे मनोबल वाढण्यासाठी शिरोधारा अत्यंत उपयुक्त ठरते. शारीरिक दौर्बल्य कमी करण्यासाठी स्नेहन, घृतपान, पिंडस्वेदन, तिक्तक्षीर बस्ती, मांसरस बस्ती यांचा उपयोग करता येतो. पंचकर्म चिकित्सेबरोबर अभ्यंतरतः रसायन चिकित्सा करता येते. अश्वगंधा, शतावरी, वसंत कुसुमाकर असे व्याधिप्रतिकारशक्ती वाढवणारे सुवर्णकल्प तसेच च्यवनप्राशसारखे अवलेह उपयोगी पडतात. आयुर्वेदीय उपचारांनी आजार पूर्ण बरा होत नसला, तरी शारीरिक व मानसिक बल वाढून उ३४ व CD8 पेशींची संख्या बरेच दिवस कायम ठेवता येते. CD4 चे प्रमाण वाढलेले दिसते. त्यामुळे रुग्णाची व्याधिप्रतिकारशक्ती, आयुर्मान वाढते व ते चांगल्या पद्धतीचे आयुष्य जगू शकतात, असा आत्मविश्वास येतो.मला म्हणाली,

''मॅडम! माझं शिक्षिका व्हायचं स्वप्न अधुरं राहिलं. आता शिक्षणही नाही व पतीही नाही. अशा दुर्धर आजाराची लागण माझी काही चूक नसताना मला झाली. आता मला जगायचंच नाही.''

तिचे बोलणे ऐकून मला खूप अस्वस्थ वाटले. खरोखरच मुलींना शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर खंबीरपणे उभे करण्याआधीच लग्न कशाला करावे, असा प्रश्न पडला व खूप वाईट वाटले. तारुण्याची, नव्या संसाराची स्वप्न पाहणाऱ्या मुलीची या आजारामुळे स्वप्न धुळीला मिळाली होती. परंतु आता तिला या अवस्थेमध्ये धीराची गरज होती. तिच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवत सांगितले,

''खचून जाऊ नको. तू अजूनही चांगले आरोग्यपूर्ण जीवन जगू शकतेस. फक्त तुला आवड म्हणून एखादे काम तू कर. म्हणजे तुझ्या जीवनाला नवी दिशा मिळेल.''

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडूळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# अहमदनगर महानगर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी ज्ञानदेव बेरड तर सरचिटणीसपदी भरत बिडवे यांची बिनविरोध निवड





नगर – अहमदनगर महानगर माध्यामिक व उच्च माध्यमिक संघाची सर्वसाधारण सभा नुकतीच मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील पंडीत यांच्या अध्यक्षतेखाली पंडित नेहरू हिंदी विद्यालय अहमदनगर येथे पार पडली.

या सभेमध्ये २०२४ ते २०२७ या कालावधीसाठी भाग्योदय विद्यालय केडगावचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड यांची अध्यक्षपदी फेरनिवड तर डॉ. ना. ज. पाउलबुद्धे विद्यालयाचे मुख्याध्यापक भरत बिडवे यांची सरचिटणीसपदी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

सभेत विषयतज्ञ अरुण पालवे, दादासाहेब नरवडे, प्रशासन अधिकारी जुबेर पठाण, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित, जिल्हा माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांनी अनेक विषयांवर सविस्तर चर्चा करून मार्गदर्शन केले. व नवीन कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी सुभेच्छा दिल्या.

नूतन कार्यकारिणी खालील प्रमाणे करण्यात आली.

अध्यक्ष : ज्ञानदेव अंबादास बेरड (भाग्योदय विद्यालय केडगाव, देवी), उपाध्यक्ष : शिवाजी घाडगे (रामराव चव्हाण विद्यालय, नागापूर), श्रीकृष्ण पवार (नय्यर माध्यमिक विद्यालय), विठ्ठल ढगे (सीताराम सरडा विद्यालय)

सरचिटणीस – भरत बिडवे (डॉ. ना. ज. पाउलबुद्धे विद्यालय), सह चिटणीस – श्रीमती जयश्री नन्नवरे (दादा चौधरी विद्यालय), कोषाध्यक्ष – सुहास धीवर (पंडित नेहरु हिंदी विद्यालय), खजिनदार – जयसिंग दरेकर (जगदंबा विद्यालय, केडगाव देवी), सह खजिनदार – सौ. सय्यद शाहिदा जुनैद (अहमदनगर हायस्कूल)

महिला आघाडी अध्यक्ष : श्रीमती एस. के. जोशी (समर्थ विद्यामंदीर सावेडी), महिला आघाडी उपाध्यक्षा : सौ. शारदा पोखरकर (आनंद माध्य. विद्यालय, गुलमोहर रोड), महिला आघाडी सचिव : सौ. संगीता पाठक (जय बजरंग विद्यालय, पाईप लाईन रोड), परीक्षा प्रमुख : दत्तात्रय कसबे (श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल), विद्या सचिव : फादर अजित मुनीस (डॉन बास्को विद्यालय, सावेडी), इंग्रजी शाळा प्रमुख : प्रभाकर भाबड (अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मेडी. स्कूल), इंग्रजी शाळा उपप्रमुख : श्रीमती राधिका जेजुरकर (रामकृष्ण इंग्लिश मेडी. स्कूल), रात्र शाळा प्रमुख : सुनील सुसरे (दादा चौधरी नाईट स्कूल), क्रीडा प्रमुख : शशिकांत गोरे (मार्कंडेय विद्यालय, सावेडी), विज्ञान विभाग प्रमुख : सौ. छाया काकडे (लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालय), तंत्र स्नेही प्रमुख : रोहित शिदोरे (जिजामाता विद्यालय, बुरुडगाव रोड), प्रसिद्धी प्रमुख : जफर शेख (अहमदनगर उर्दू हायस्कूल), जिल्हा प्रतिनिधी : श्रीमती जोत्स्ना शिंदे (सेंट सेविअर हायस्कूल, तारकपूर), श्रीमती गीता तांबे (स्वामी विविकानंद इंग्लिश मेडी. स्कूल), मार्गदर्शक सल्लागार : सुनील पांडुरंग पंडीत (राज्य मुख्याध्यापक महा मंडळ उपाध्यक्ष), विजयकुमार पोकळे (प्राचार्य, रेसिडेन्शिअल हायस्कूल व जुनिअर), सौ. शीतल स. बांगर (राज्य मुख्याध्यापक महा मंडळ प्रतिनिधी), उल्हास दुग्गड (भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल).

# स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा संघ निवड चाचणी ४ ऑक्टोबर रोजी होणार

नगर – क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा २०२४-२५ ही स्पर्धा विभागीय उप संचालक छत्रपती संभाजीनगर विभाग व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ७ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत 'सहकारी सूत गिरणी मैदान, जळगाव रोड, सिल्लोड, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली आहे.

या स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा कुस्तीगीर संघ वरिष्ठ पुरुष फ्रीस्टाइल व वरिष्ठ महिला फ्रीस्टाइल विभागात पात्र ठरला आहे. तरी अहमदनगर जिल्हा संघ निवड चाचणी ४ ऑक्टोबर रोजी संभाजीराजे कुस्ती केंद्र, गजराज फैक्ट्री जवळ, भिस्तबाग चौक, अहमदनगर येथे आयोजित केली आहे. जिल्ह्यातील सर्व कुस्तीगीर, वस्ताद व मार्गदर्शक यांनी याची नोंद घ्यावी व स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन अध्यक्ष आ. संग्राम जगताप, सचिव प्रा. डॉ. पै. संतोष भुजबळ, खजिनदार पै. शिवाजी चव्हाण यांनी केले आहे.



सावेडी नाका येथील चित्रकूट गुरूकुलच्या चिमुरड्यांनी गांधी जयंतीस आयोजित स्वच्छता रॅली. समवेत संस्थाचालक संजय चव्हाण, प्राचार्या सारीका आनंद, गांधींच्या वेशात चिमुकले.

# महात्मा गांधी जयंतीनिमित्त चित्रकूट गुरूकुलच्या चिमुरड्यांनी रॅली काढून दिला स्वच्छतेचा संदेश

नगर – स्वच्छता हाच चांगल्या आरोग्याचा मूलमंत्र आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतानाच देश वासियांना वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता, हायजिनचा संदेश दिला. त्यांच्या याच प्रेरणेतून देशभरात स्वच्छ अभियान ही चळवळ बनली आहे. महात्मा गांधी जयंती निमित्त सावेडी नाका येथील चित्रकूट गुरूकुलच्या चिमुरड्यांनी स्वच्छता रॅली काढून नगरकरांना स्वच्छतेचा मंत्र दिला.

संस्थेचे संचालक संजय चव्हाण यांच्या संकल्पनेतून आणि प्राचार्या सारीका आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी हातात स्वच्छतेचे मार्मिक संदेश देणारे फलक हातात घेतले होते. महात्मा गांधी यांच्या वेशभूषेतील चिमुरड्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

आरोग्याचे विविध प्रश्न उद्भवण्यास अस्वच्छता कारणीभूत असते. प्रत्येक जण स्वतःचे घर स्वच्छ टापटीप ठेवतो. परंतु आपल्या घराचा परिसरही स्वच्छ सुंदर असला पाहिजे. आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन कचरा संकलन करतात. त्यांना सहकार्य केले पाहिजे. ज्यामुळे आपले संपूर्ण शहर स्वच्छ, चांगले राहील. पर्यायाने अनेक आजारही आपल्या पासून दूर राहतील.

या उपक्रमाचे परिसरातील नागरिक, दुकानदारांनी कौतुक करीत चित्रकूट गुरूकुलच्या चिमुरड्यांचे अभिनंदन केले. या उपक्रमासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. पालकांनीही शाळेच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.

# निसर्गोपचारचा रथ सुदृढ समाजनिर्मितीत प्रेरक असतो

## डॉ.वैशाली किरण यांचे प्रतिपादन; आरोग्यवर्धीनी योग निसर्गोपचार संस्था आयोजित शिबीरात प्रतिपाद

नगर – सद्य स्थितीत जंकफुड, व्यायामाचा अभाव आणि मोबाईलचा अतिरेक यातुन असंख्य समस्या निर्माण झाल्या आहेत. केवळ औषधे हा आजारावरचा उपाय नाही. सुयोग्य आहार, दैनंदिन जीवन पद्धती आणि कौटूबिंक सुसंवाद या त्रिसुत्रीचा वापर करुन आपण आपली शारीरिक व मानसिक प्रतिकारशक्ती सुदृढ केली तर संपूर्ण कुंटूबच निरोगी होईल. यासाठी गृहीणींची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगून आरोग्यवर्धीनीने चालविलेला हा निसर्गोपचारचा रथ सुदृढ समाजनिर्मितीत प्रेरक असल्याचे अध्यक्ष स्थानावरुन बोलतांना डॉ.वैशाली किरण म्हणाल्या.



आरोग्यवर्धीनी योग निसर्गोपचार संस्थेच्या वतीने आयोजित शिबीराप्रसंगी बोलतांना साईदिप हॉस्पिटलच्या संचालिका डॉ.वैशाली किरण.

आरोग्य सुदृढ, निरोगी, प्रसन्न राहण्यासाठी संस्था निसर्गोपचाराच्या माध्यमातुन कार्य करत आहे. संस्थेमधुन प्रशिक्षित अनेक युवक युवतीनी देशभर नव्हे तर परेदशात ही चळवळ वृद्धींगत गेली असल्याचा आनंद असल्याचे सांगितले. तर आपल्या संस्थेच्या चालू असलेल्या एम ए योग शेवटच्या वर्षाला आपल्या संस्थेची शुभी अग्रवाल हीने प्रथम क्रमांक व एम ए योग प्रथम वर्षाच्या डॉक्टर सोनल बोरुडे यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. संस्थेच्या विद्यार्थ्यांचे कौतुक करत ह्या गोष्टी सांगितल्या आहेत.

आरोग्यवर्धीनी योग निसर्गोपचार संस्थेच्या वतीने आनंदऋषीजी रक्तपेढीच्या सभागृहात अयोजित एक दिवसीय शिबीराच्या प्रसंगी त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अमरावती येथील निसर्गोपचार तज्ञ डॉक्टर डॉ. संजीव गौतम, संस्थेच्या अध्यक्षा हेमांगिणी पोतणीस, प्राचार्य तथा निसर्गपचार तज्ज्ञ सचिव हेमा सेलोत, योगतज्ञ अनिल मेहेर उपस्थित होते.

डॉ. संजीव गौतम यांनी मनोगतात राज्यात व देशात असंख्य संसर्गजन्य आजाराच्या लाटा येत आहे. दवाखाने रुग्णांनी आसंडून वाहत असतांना अचुक निदान, उपचार व आराम वाटणे या गोष्टींपासून मात्र रुग्ण वंचित रहातो आहे. भारतीय आयुर्वेद, निसर्गोपचारातुन मानवी शरीराला कुठल्याही दुष्परिणामांना बळी न पडता नैसर्गिक रित्या बरे केले जावु शकते. तसेच पुन्हा आजारी पडु नये यासाठी त्यांच्या आहार व व्यायामातुन त्यांची प्रतिकार शक्ती वाढविली जाणे सहज शक्य आहे. निसर्गोपचाराचा अंगिकार आपण करु शकलो तर अशा अनेक आजारांच्या लाटा आपण थोपवु शकतो, असा आशावाद अमरावती येथील डॉ. संजीव गौतम यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात अध्यक्षा डॉ.हेमांगिणी पोतणीस यांनी संस्थेच्या कार्याचा आढवा घेतला. डॉ.हेमा सेलोत यांनी आपल्या मनोगतात गेली ३० वर्षापेक्षा जास्त काळ सामाजिक

या दिवशी पूर्ण दिवस शिबिरांमध्ये सकाळी फॉरेस्ट जाधव यांनी झाड पाल्यापासून उपचार करता येईल तसेच प्रत्येक झाडाचा वापर कोणत्या आजारासाठी केला जातो यावरती खूप सुंदर अशी माहिती दिली, मयूर कांगणे योग शिक्षक यांनी योगनिद्रा व योगाचे महत्व दैनंदिन जीवनातले पटवून दिले. दीपशिखा कराचीवाला यांनी फेस योगा व मेंटल हेल्थ आणि लाफ्टर योगा, शारीरिक योगा बरोबरच हा योगा सुद्धा किती महत्त्वाचा आहे, याचे महत्त्व पटवून दिले. शुभी अगरवाल एम ए योगा पूर्ण करून लहानपणापासून स्वतःवरील निसर्गोपचार पद्धतीने केलेला उपचार व झालेला फायदा हा खूप छान समजून सांगितला व निसर्गोपचार पद्धतीने केलेला पीसीओडी, हिमोग्लोबिन लेवल, हे गार पाण्याच्या पट्टी पोटावर ठेवल्या तर किती सहज बरे केले हे सांगितले.

सुत्रसंचालन कु.ऋतुजा गिते तर आभार योगतज्ञ अनिल मेहेर यांनी मानले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते टिळक विद्यापिठ पुणे व आरोग्यवर्धीनी योग निसर्गोपचार संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या पदविका, पदव्युत्तर पदवी, नॅचरल ब्युटीशियन या अभ्यासक्रमात यशस्वीना सन्मानपत्र देण्यात आले. यावेळी निसर्गोपचार प्रेमी, नागरीक उपस्थित होते. दिवसभर चाललेल्या या शिबीरात राज्यभारातुन आलेल्या विविध तज्ञांनी मार्गदर्शन केले.

# 'अर्शदनामा' भिंती उद्ध्वस्त करेल, नवे सेतू बांधिल

## संजय आवटे यांचे प्रतिपादन

नगर – अर्शद शेख व्यवसायाने आर्किटेक्ट असले तरी सोशल आर्किटेक्टच्या अंगाने त्यांच्या वास्तुशैलीकडे पहायला हवे, पाडणारे हात वाढत चाललेले असताना, बांधणारे हात या लेखनात दिसतात. पूल बांधणारे हात दिसतात. सगळीकडे अंधारून आलेले असताना आश्वासक काही गवसावे, असे हे लेखन आहे, असे प्रतिपादन संपादक संजय आवटे यांनी केले.



अर्शदनामा पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, संजय आवटे, अशोक सब्बन, प्रा.डॉ. मेहबूब सय्यद, डॉ. प्रशांत शिंदे, आर्की. अर्शद शेख आदी.

लखनऊ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे यांच्या हस्ते आर्किटेक्ट अर्शद शेख यांच्या 'अर्शदनामा' पुस्तकाचा प्रकाशन सोहळा सी.एस.आर. डी. सभागृहात पार पडला. अध्यक्षस्थानी संजय आवटे होते. यावेळी मंचावर अशोक सब्बन, प्रा.डॉ. मेहबूब सय्यद, डॉ. प्रशांत शिंदे आदि उपस्थित होते.

अर्शद शेख यांच्या लेखनाला असणारे आधिष्ठान व्यापक आहे. समकालीन संदर्भावर मौन बाळगणे त्यांना मान्य नाही. त्यामुळे ते बोलतात, भूमिका घेतात, ठोस मांडणी करतात. सामाजिक हितासाठी व्यापक ध्येयासाठी त्यांनी लेखणी हातात घेतली आहे हे जाणवते. व्यवस्थेला प्रश्न विचारताना, ते वास्तवाची चिरफाड करतात. हेतूतः संदर्भ बदलून विपर्यस्त मांडणी होत असलेल्या कालखंडात 'आयाडिया ऑफ इंडिया' ची समर्पक मांडणी अर्शद शेख करतात.

राष्ट्रवादाची मांडणी करताना, अत्यंत शास्त्रशुद्धपणे ते मांडत जातात. हिंदू-मुस्लिम एकतेबद्दल मांडणी करताना समाज मनाचा अचूक वेध घेत, उत्तराची वाट प्रशस्त करतात. प्रत्येकाने अर्शदनामा वाचावा असे संजय आवटे यांनी असांगितले.

डॉ. सर्जेराव निमसे म्हणाले अर्शद शेख हे कृतीशिल विचारवंत आहे. व्यवस्था परिर्वतनासाठी काम करणारा कार्यकर्ता, शास्वत आणि पर्यावरणपुरक वास्तुशैलीसाठी प्रयोग करणारा आर्किटेक्ट, अहमदनगरच्या नियोजनबद्ध प्रयत्न करणारा सजग नागरिक अशी त्यांची अनेक विध रूपे आहेत. त्यातुन त्यांचे लेखन आकार घेत असल्याने त्यात असे वैविध्य स्वाभाविक आहेत. 'अर्शदनामा' मध्ये त्यांनी साकारलेले वैभवशाली अहमदनगर प्रशंसनीय आहे. अर्शद शेख शाश्वत विकासासाठी 'सिव्हील सोसायटीची' आग्रही भूमिका मांडतात. यालाच अनुसरून आम्ही शहरातील सुज्ञ मंडळींना घेऊन 'अहमदनगर नागरी मंच' ची स्थापना केली आहे असे डॉ. सर्जेराव निमसे म्हणाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला चाँद सुलताना हायस्कूलचे माजी प्राचार्य अब्दुल कादिर, शहाशरीफ दर्ग्याचे विश्वस्त निजाम जहागिरदार यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच कार्यक्म्राचे सुत्रसंचालन प्रा.डॉ. महेबूब सय्यद यांनी केले.

कार्यक्रमास भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे, कॉ. बाबा आरगडे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे आण्णा सावंत, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी महापौर अभिषेक कळमकर, अब्दुल करीम हुंडेकरी, इंजि. इकबाल सय्यद, आर्किटेक्ट मिनल काळे, गुरदयारसिंग सागु, युनूस तांबटकर, आनंद शितोळे, संध्या मेढे, इंजि. अभिजीत वाघ, विजयसिंह होलम, सुधीर लंके, अशोक निंबाळकर, सॅम्युअल वाघमारे, प्रा. मुदस्सिर सय्यद, संतोष गायकवाड, तुषार सोनवणे, अतुल देठे, उबेद शेख, सुनिल गोसावी, राजेंद्र पवार, गिरीश धोत्रे, समीर आंबेकर, ॲड. शिवाजी आदमाने, डॉ. विजय कुमठेकर, राम गायकवाड, मोहन इंगळे, बापू चंदनशिवे, आसिफ सर, अतिक शेख, अनिस शेख, अब्दुल रहीम शेख, हबीब खान पठाण, फिरोज तांबटकर, फिरोज पठाण, अफसर मिर्झा, आलमखान आदीं उपस्थित होते.



अहमदनगर महाविद्यालयात 'ती' ची सुरक्षितता हा कार्यक्रम 'वुमन सेल' तर्फे आयोजित करण्यात आला होता. त्यात मुख्य अतिथी म्हणून अहमदनगर शहराच्या पोलीस सब इन्सपेक्टर श्रीमती प्रियंका आठरे आदी.

# स्त्रियांनी मानसिक, शारिरिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम असावे

## पोलीस सब इन्स्पेक्टर प्रियंका आठरे यांचे प्रतिपादन; अहमदनगर महाविद्यालयात 'ती'ची सुरक्षितता कार्यक्रम

नगर – अहमदनगर महाविद्यालयात 'ती' ची सुरक्षितता हा कार्यक्रम 'वुमन सेल' तर्फे आयोजित करण्यात आला होता. त्यात मुख्य अतिथी म्हणून अहमदनगर शहराच्या पोलीस सब इन्सपेक्टर श्रीमती प्रियंका आठरे यांनी स्त्रियांच्या सुरक्षा संदर्भात मोलाचे मार्गदशन केले.

स्त्रियांनी मानसिक, शारिरिक आणि आर्थिक दृष्ट्या सक्षम असावे, एखाद्या परिस्थीत अडकल्यास पोलीसांची मदत कशी मिळवता येईल, स्त्रियांसाठी कोणते कायदे लागू आहेत, कश्याची माहिती असावी या गोष्टींवर जास्त भर दिला. त्यांचे अनुभव सांगताना रोजच्या जीवनात कोणत्या गोष्टी लक्षात ठेवून स्वतःला सुरक्षित कसे करता येईल याची माहिती दिली.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थिनी, प्राध्यापिका उपस्थित होत्या. श्रीमती प्रियंका आठरे यांचा सत्कार वुमन सेल को-ओरडीनेटर श्रीमती रूपाली कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला, रिया मुनोत, प्राची वाळुंजकर यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

महाविद्यालयाचे उप-प्राचार्य डॉ. प्रितम बेदरकर डॉ. दिलीप भालसिंग, नॉन ग्रेन्ट चिफ को-ओरडीनेटर डॉ. सय्यद रझाक आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस यांच्या मार्गदशनाखाली ती ची सुरक्षितता हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# जि.प. शाळेत साहित्याची चोरी

नगर – नगर तालुक्यातील वाकोडी फाटा येथील जिल्हा परिषद शाळेतील पहिली व तिसरीच्या वर्गाचे कडीकोयंडा तोडून त्यातील वायरलेस ॲम्प्लीफायर व मायक्रोम फोन असा सहा हजाराचा ऐवज चोरून नेला आहे. दि. ३० सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाच ते दि.१ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेनऊच्या दरम्यान ही घटना घडली आहे.

या प्रकरणी मुख्याध्यापिका ज्योती मारूती भोर (वय ४२, रा. विद्या कॉलनी, कल्याण रस्ता) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० सप्टेंबर रोजी शाळा सुटल्यानंतर फिर्यादी यांनी सायंकाळी साडेपाच वाजता शाळेचे सर्व वर्ग कुलूप लावून बंद केले होते. दुसऱ्या दिवशी १ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेनऊ वाजता फिर्यादी शाळेवर आल्या असता त्यांना पहिली व तिसरीच्या वर्गाचे कुलूप तुटलेले दिसले. त्यातील वायरलेस ॲम्प्लीफायर व मायक्रोम फोन चोरीला गेल्याचे लक्षात आले. त्यानंतर फिर्यादी यांनी कॅम्प पोलिसांना माहिती देत गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस अंमलदार आर. एस. मिसाळ अधिक तपास करत आहेत.

# महेश नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

भिंगार – महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगार या संस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वा. भाग्यलक्ष्मी लॉन, भिंगार या ठिकाणी संस्थेचे विद्यमान चेअरमन डॉ. अशोक शांतीलाल चंगेडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.






भिंगार येथील महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या ३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी बोलताना चेअरमन डॉ. शांतीलाल चंगेडे. व्यासपीठावर सर्व संचालक. दुसऱ्या छायाचित्रात सभा सुरू होण्यापूर्वी उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते महेशाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन डॉ. अशोक शांतीलाल चंगेडे होते. सभेच्या सुरुवातीला सहकार खात्याचे प्रशिक्षक प्रा. साखरे यांनी सभासदांना सोप्या भाषेत समजेल असे प्रशिक्षण दिले. सहकारी संस्थेतील सभासदांचे हक्क, कर्तव्य, जबाबदाऱ्या यावर सविस्तर माहिती दिली.

सभा सुरु करण्यापुर्वी नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते महेशाच्या प्रतिमेचे पुजन व दिप प्रज्वलन करण्यात आले त्यावेळी संस्थापक चेअरमन नंदकुमार झंवर, भिंगार अर्बन बँकेचे चेअरमन अनिलराव झोडगे, महात्मा फुले पतसंस्थेचे चेअरमन शरदराव झोडगे उपस्थित होते.

सभेत प्रथम संस्थेचे संस्थापक संचालक कै. जगदिश झंवर व स्व. प्रेमराज गुगळे व इतर ज्ञात अज्ञात स्वर्गीय सभासदांना संस्थेच्या वतीने संस्थेचे व्यवस्थापक राजेंद्र मेहेर यांनी श्रद्धांजली वाहिली.

सभेस उपस्थित राहिल्याबद्दल उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांचा संस्थेतर्फे चेअरमन डॉ. अशोक चंगेडे यांनी सत्कार केला. संस्थेचे व्यवस्थापक राजेंद्र मेहेर यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले व त्यास सर्व सभादांनी एकमताने मंजुरी दिली. सर्व ठराव एकमताने मंजुर केले.

डॉ. अशोक चंगेडे यांनी आर्थिक वर्षात झालेलया संस्थेच्या सद्यस्थितीबद्दल सविस्तर सादरीकरण करतांना सांगितले की, आपली संस्था अशी आहे कि, जिच्या ठेवीपेक्षा गुंतवणुक इतर बँकेतील जास्त आहे, याचा मला अभिमान वाटतो. प्रगतीत सर्व संचालक व कर्मचारी वर्गाचा मोठा सहभाग असल्याचे नमुद केले. सभासदांना १५% लाभांश डिव्हिडंड देण्याचे जाहिर केले.

शरद झोडगे म्हणाले, अहवाल सालात झालेला नफा व प्रगती उल्लेखनीय आहे, अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

भिंगार अर्बन बँकेचे व्यवस्थापक शशिकांत महाजन यांनी पतसंस्थेतील कर्मचाऱ्यांनी कर्तव्यनिष्ठपणे काम करावे. संस्थेत प्रगतीकारक योजना राबवाव्यात व ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित ठेवण्याकडे लक्ष द्यावे.

शहर सहकारी बँकेचे संचालक माणिकराव विधाते यांनी संस्थेच्या भावी काळासाठी शुभेच्छा दिल्या.

सभेसाठी संस्थेचे सभासद, विविध बँकांचे तसेच पतसंस्थांचे पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते. सभासदांच्या गुणवंत पाल्यांना शिष्यवृत्ती प्रमाणपत्र व मुदत ठेव पावती देऊन गौरविण्यात आले.

नंदकुमार झंवर, अनिल झोडगे, शरद झोडगे, बापुसाहेब शिंदे, विजयकुमार भंडारी, अर्जुनराव बेरड, कैलास रासकर, किसनराव चौधरी यांचा सत्कार संस्थेच्यावतीने करण्यात आला.

सभेस व्हा. चेअरमन शांतीलाल माणकचंद मुनोत, ज्येष्ठ संचालक सुंदरलाल सोहनलाल भंडारी, डॉ. श्रीकांत लक्ष्मीदास गांधी, प्रकाशलाल मांगीलाल चोरडिया, राजेंद्र नवलमल शिंगवी, संजयकुमार माधवराव सपकाळ, बिपीनचंद्र बन्सीलाल लुणिया, किरण प्रकाश पतके, कांतीलाल मोतीलाल बोरा, विनोद बन्सीलाल भंडारी, नितीन पोपटलाल शिंगवी, सुशील सुंदरलाल भंडारी, पवन सुरेश गुंदेचा, संजय शांतीलाल मुनोत, सुदाम तुळशीराम गांधले, मारुती कुंडलिकराव पवार, संचालिका सौ. वैशाली वर्धमान बोरा, सौ. अंजली नितीन शिंगवी व व्यवस्थापक राजेंद्र लालचंद मेहेर व संस्थेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सभेच्या शेवटी व्हा.चेअरमन शांतीलाल मुनोत यांनी पाहुणे, वेगवेगळ्या संस्थेचे चेअरमन संचालक व सभासद तसेच आजी-माजी संचालकांचे आभार मानले. राष्ट्रगीताने सभेची सांगता झाली.

# अहमदनगर जिल्ह्यातील व्यापारी करदात्यांसाठी जीएसटी विभागाकडून अपिलीय कार्यालयास मंजुरी

## जिल्हा कर सल्लागार संघटनेच्या पाठपुराव्याला यश, राज्य कर उपायुक्त नेहा देशमुख व भगवान उंडे यांचा सत्कार



अहमदनगर जिल्हास्तरीय व्यापारी करदात्यांसाठी जीएसटी विभागाकडून अपिलीय कार्यालयास मंजुरी मिळाल्याबद्दल राज्य कर उपायुक्त नेहा देशमुख व भगवान हांडे यांचा सत्कार करताना किशोर गांधी, सुनील कराळे, उपाध्यक्ष आनंद लहामगे आदी.

नगर – जिल्ह्यातील व्यापारी करदात्यांसाठी राज्य जीएसटी विभागाकडून अपिलीय कार्यालयास मंजुरी मिळाली असून, अहमदनगर जिल्हा कर सल्लागार संघटनेच्या पाठपुराव्याला यश आले आहे. नुकतेच याबाबत राज्य विक्रीकर विभागाकडून या मागणीस सकारात्मक प्रतिसाद प्राप्त होऊन, अहमदनगर जिल्ह्यातील करदात्यांच्या सोयीसाठी स्वतंत्र अपिलीय विभाग सुरू करण्यात आले आहे. याबद्दल तमाम व्यापारीवर्ग व करसल्लागारांनी आनंद व्यक्त केला.

अहमदनगर वस्तू व सेवा कर कार्यालयाच्या अपील विभागासाठी राज्य कर उपायुक्त म्हणून नेहा देशमुख व राज्यकर उपायुक्तपदी (अपील) भगवान उंडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा अहमदनगर जिल्हा कर सल्लागार संघटनेकडून सत्कार करण्यात आला. तर त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष किशोर गांधी, सुनील कराळे, उपाध्यक्ष आनंद लहामगे, नितीन डोंगरे, पुरुषोत्तम रोहिडा, निलेश चोरबेले, प्रसाद किंबहुने, सोहम बरमेचा, आशिष मुथ्था, अंबादास गाजूल, सुनील सरोदे, करण गांधी, अमित पितळे आदींसह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्याचा वाढता विस्तार बघता, गेल्या अनेक वर्षांपासून विक्रीकराचे बाबतीत, जिल्ह्यातील व्यापारी, करसल्लागारांना, करदात्यांच्या अपिलीय कामकाजासाठी नाशिक, पुणे येथे जावे लागत होते. याबाबत अहमदनगर डिस्ट्रिक्ट टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने अहमदनगर येथे स्वतंत्र अपील कामकाज होणेबाबत मुंबई व नाशिक येथील आयुक्त कार्यालयाशी वेळोवेळी चर्चा विनिमय करण्यात आले होते.

पूर्वीचा मुंबई विक्रीकर कायदा, त्यानंतर २००६ पासून अस्तित्वात आलेला व्हॅट कायदा आणि सन २०१७ पासून संपूर्ण देशामध्ये एक राष्ट्र–एक कर या तत्वावर आधारित असलेला वस्तू व सेवा कर कायद्याची राज्यात सुरुवात झाली. संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये, भौगोलिकरीत्या विचार केल्यास, क्षेत्रफळाच्या दृष्टीने अहमदनगर जिल्हा हा सर्वात मोठा जिल्हा म्हणून ओळखला जातो. लोकसंख्येचा तसेच जिल्ह्यातील उद्योग व्यवसाय, सहकार क्षेत्राचा विचार करता राज्य सरकारला या जिल्ह्यातून, मोठ्या प्रमाणावर महसुली उत्पन्न मिळत असते. या जिल्ह्यासाठी स्वतंत्र जीएसटीसाठी अपिलीय कार्यालय असावे ही सर्व व्यापारी वर्ग व करसल्लागारांची भावना होती.

जिल्ह्याच्या ठिकाणीच अपील कामकाजाची सोय निर्माण झाल्यामुळे व्यापारी तसेच कर सल्लागाराना त्यांचे कामकाज वेळेत पूर्ण करणे शक्य होणार आहे. अपील कामासाठी नाशिक येथे जाण्याची त्यांना गरज पडणार नाही.

जीएसटीच्या अपील कामासाठी व्यापारी व करसल्लागारांना नाशिक अथवा पुणे येथे जाण्याची गरज पडणार नाही. जिल्ह्यात वाढते व्यापारीकरण व औद्योगिकरणामुळे जीएसटीच्या अपिलीय कार्यालयाची गरज होती. सर्वात्र मोठा जिल्हा असलेल्या ठिकाणी ही सोय निर्माण झाल्याने जीएसटी संदर्भातील विविध प्रश्न मार्गी लागणार आहे. जिल्ह्यातील विविध व्यापारी व करदात्यांच्या सुमारे दीड हजाराचे आसपास अपिलीय केसेसचे पेंडिंग असलेले कामकाज देखील पूर्णत्वास जाऊ शकणार आहे, असे नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे जॉईट सेक्रेटरी आनंद लहामगे यांनी सांगितले.



पंजाबी सनातन धर्मसभेच्या सर्जेपुरा येथील राधा–कृष्ण मंदिरात विधीवत पूजा करुन गुरुवारी (दि.३ ऑक्टोबर) सकाळी उत्साहात घटस्थापना करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित असलेले भाविक.

# पंजाबी सनातन धर्मसभेच्या राधा–कृष्ण मंदिरात घटस्थापना

## ८ ऑक्टोबरला माता की चौकी, तर ११ ऑक्टोबरला पुर्णाहूती यज्ञ

नगर – पंजाबी सनातन धर्मसभेच्या सर्जेपुरा येथील राधा–कृष्ण मंदिरात विधीवत पूजा करुन ३ ऑक्टोबर रोजी सकाळी उत्साहात घटस्थापना करण्यात आली. नवरात्र उत्सवानिमित्त राधा–कृष्ण मंदिरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

ट्रस्टचे अध्यक्ष राकेश गुप्ता व सर्व विश्वस्तांच्या हस्ते घटस्थापना झाली. यावेळी उपस्थित असलेल्या शीख, पंजाबी भाविकांनी देवीचा जयघोष केला. गेल्या ५८ वर्षापासून मंदिरात नवरात्र उत्सवानिमित्त घटस्थापना करुन विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या वर्षी दररोज संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत किर्तन होणार आहे. तर दररोज संध्याकाळी ७ वाजता आरती होणार आहे. नवरात्रनिमित्त मंदिरामध्ये आकर्षक फुलांची सजावट करुन विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

मंगळवारी (दि. ८ ऑक्टोबर) रात्री ८ वाजता माता की चौकीचा कार्यक्रम होणार आहे. यामध्ये श्रीरामपूर येथील राजेश अलग जागरण मंडळाचे कलाकार देवीचे भक्तीगीत सादर करणार आहे. आरतीनंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

११ ऑक्टोबर रोजी सकाळी ९:३० वाजता महिला भजन मंडळीच्या उपस्थितीमध्ये पूर्णाहुति यज्ञ होणार आहे. तर दररोज नवरात्र उत्सवानिमित्त सायंकाळी ४ ते ६ वाजता भजन होणार आहे. संध्याकाळी ७ वाजता माता की आरती पार पडणार आहे.

या कार्यक्रमात भाविकांना सहभागी होण्याचे आवाहन राधा–कृष्ण मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# नासा स्पेस ॲप स्पर्धेच्या माध्यमातून नासाच्या शास्त्रज्ञांना भेटण्याची संधी



हेमंत केदारे



डॉ. सुकन्या फणसाळकर

नगर – संपूर्ण जगात होणाऱ्या अमेरिकन नासा स्पेस स्पर्धेत सहभागी होण्याची संधी नगरकरांना मिळणार असून ५ व ६ ऑक्टोबर या दोन दिवशी नगर येथील आय. एम. एस. ( IMS) कॉलेज मध्ये ही स्पर्धा होणार असल्याचे इस्रो स्पेस ट्रिटर असलेले हेमंत केदारे सर आणि डॉ. सुकन्या फणसाळकर यांनी सांगितले.

दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धेत सर्व वयोगटातील व्यक्ती सहभाग घेऊ शकतात. शॉर्ट फिल्म, गेम्स, स्टोरीज, कोडींग, यावर प्रोजेक्ट करू शकतात. ४८ तासात हे सादरीकरण आपणास पूर्ण करावयाचे आहे. जी व्यक्ती यशस्वीपणे हा प्रोजेक्ट वेळेत सादर करेल, त्याला नासाच्या शास्त्रज्ञांबरोबर वैचारिक देवाणघेवाण करण्याची संधी मिळणार असल्याचेही हेमंत केदार सर यांनी सांगितले.

या संपर्क उपक्रमात मुंबई, पुणे तसेच विदेशातील संशोधकही सहभागी होणार आहेत.

नगरमध्ये ही संधी आर्यभट्ट इन्स्टिटयूटने मोफत उपलब्ध करून दिली असल्याचे प्रा. सुकन्या फणसाळकर यांनी सांगितले. माहितीसाठी ८४४६७२३९६० यावर साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# शारदिय नवरात्र निमित्त नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात ५ ऑक्टोबर रोजी ‘श्रीराम, जय राम, जय जय राम’ सामूहिक संगीतमय नाम जप चे आयोजन




नगर – नवी पेठ येथील श्रीराम मंदिरात दर शनिवारी सामुहिक श्री हनुमान चालिसा पठण व भजन संध्या या कार्यक्रमास भाविक उपस्थित राहतात. येत्या शनिवारी ।। श्रीराम जयराम जय जय राम ।। ह्या संगीतमय अखंड सामुदायिक जप, श्री हनुमान चालीसा पाठ महाआरती व महाप्रसादाचे आयोजन ५ ऑक्टोबर रोजी शारदीय नवरात्र निमित्ताने श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट श्रीराम मंदिर, नवीपेठ येथे रात्री ८ ते रात्री ११ या वेळेत होणार आहे.

नामस्मरण स्वरूपी अनुष्ठानात भाग घेऊन सर्व शहरवासीयांनी प्रभू श्रीराम चरणी आपली सेवा अर्पित करावी, असे आवाहन श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ, ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखिल शेटीया यांच्या वतीने करण्यात आले.

गेल्या १७ वर्षापासून श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने मंदिरात दर शनिवारी हनुमान चालीसा पठण कार्यक्रम व महाप्रसाद वितरण भक्ती भावाने करण्यात येतो. गेल्या १७ वर्षापासून श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळाच्या वतीने श्रीराम नवमी व हनुमान जन्मोत्सव, गोकुळ अष्टमी, देवदिवाळी, अन्न कुट छप्पन भोग उत्सव, तसेच धार्मिक उत्सव ट्रस्टच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतात.

तसेच संपूर्ण मंदिराची देखभाल ट्रस्टच्या वतीने करण्यात येते मंदिराचे नूतन प्रवेशव्दार हे आयोध्या येथील श्रीरामलल्ला नूतन प्रतिमा प्रमाणे भगवान श्री विष्णु दशअवतार, डाव्या बाजूस श्री हनुमानजी, उजव्या बाजूस गरुड भगवान अशा स्वरुपात सुंदर आकर्षक प्रवेशव्दार नव्याने साकारण्यात आले आहे. हेच मंदिराचे मुख्य आकर्षण ठरत आहे. श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट वतीने मंदिर नुतनीकरण व नविन आकर्षक प्रवेशद्वार करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात माता भगिनींनी लाल किंवा केशरी पोशाख परिधान करून व बंधुंनी सफेद कुर्ता पायजमा परिधान करून नवी पेठ येथील श्रीराम मंदिरात भक्तिमय वातावरणात सहभागी व्हावे, असे आवाहन श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने करण्यात आले.

## स्नेहबंध फौंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय १२ वर्षाखालील मुला मुलींसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा

नगर – स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने नवरात्र उत्सवानिमित्त जिल्हास्तरीय १२ वर्षाखालील मुला–मुलींसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यांना सहभाग घ्यावयाचा आहे, त्यांनी आपले पूर्ण नाव, वय, पत्ता व मोबाईल नंबर १३ ऑक्टोबरपर्यंत ८७ ९३ १९ १९ १९ या क्रमांकावर नुकताच मोबाईलवर काढलेला फोटो पाठवावा. पहिला गट वय १ ते ५ वर्षे व दुसरा गट ६ ते १२ वर्षे असा असेल. (फोटो जुना व फोटो कॅमेरामधील फोटो चालणार नाही. स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समिती परीक्षण करून दोन्ही गटातील पहिल्या ३ / ३ स्पर्धकांना गौरवण्यात येणार आहे.


## श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

SHRIRAM HOUSING FINANCE

**नोंदणीकृत कार्यालय** : श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, गेट क्र.५, जुना क्र.११, दुसरी गल्ली, केनातोफ रोड, अल्वारपेट, तेयनमपेट, चेन्नई – ६०००१८ **शाखा कार्यालय** : पहिला मजला, रामनारायण कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ३२+३३+१, सर्व्हे नं. २०/२ए१, मातोश्री पेट्रोल पंपाजवळ, सक्कर चौक, अहमदनगर ४१४००१. वेबसाईट : www.shriramhousing.in

## भौतिक ताबा सूचना

जसे की, निम्नस्वाक्षरीदार हे श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचे (एसएचएफएल) प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरीटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल ॲसेटस्‌ ॲन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या (उक्त कायदा) तरतुदींच्या अंतर्गत आणि उक्त कायद्याचे कलम १३ (१२) सहवाचिता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ ( उक्त नियम) नियम ३ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी कर्जदार / सह–कर्जदार/ तारणकर्ता यांना ज्यांचे तपशील खालील कोष्टकात नमूद करण्यात आले आहेत, उक्त मागणी सूचनेत नमूद केलेल्या रक्कमेची परतफेड करण्यासाठी मागणी सूचना जारी केली होती. कर्जदार / सह–कर्जदार/ तारणकर्ता यांनी या रकमेची परतफेड न केल्याने याद्वारे कर्जदार / सह–कर्जदार/ तारणकर्ता यांना व तमाम जनतेला सूचना देण्यात येत आहे की निम्नस्वाक्षरीदाराने एसएचएफएलचे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरीटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल ॲसेटस्‌ ॲन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा) चे कलम १३ (४) सहवाचिता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ चा नियम ८ यांद्वारे मिळालेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या गहाण मालमत्तांचा खालील तक्त्यातील इतर सर्व तपशिलांसह विशिष्टपणे नमूद केलेल्या तारखांना प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

| कर्जदाराचे नाव व पत्ता |
|---|
| १) श्री. तानाजी साहेबराव धावरे (कर्जदार – १ )<br>२) सौ. रेणुका तानाजी धावरे (कर्जदार – २)<br>दोघांचा पत्ता – रो हाऊस नं. ५, श्री स्वामी समर्थ रेसिडेन्सी, प्लॉट नं. ६ ते ११/०३ (दक्षिण भाग) सर्व्हे नं. ७२/५, उभा मारुतीजवळ, बोल्हेगाव, अहमदनगर ४१४००१ आणि दुसरा पत्ता – झाडबुके मैदान, बार्शी, सोलापूर, महाराष्ट्र ४१३४०१ |
| **कर्जदाराची थकबाकी रक्कम व मागणीची सूचना** |
| रुपये १०,८०,९४६/– (रुपये दहा लाख ऐंशी हजार नऊशे शेहचाळीस) ११/०९/२०२३ कर्ज संदर्भ क्रमांक एसएचएलएचएएम डीआर ००००४५४ व पुढील व्याज करारानुसार ही नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत देण्यात यावी.<br>मागणी नोटीस दिनांक १२/०९/२०२३<br>भौतिक ताबा दिनांक ३० सप्टेंबर २०२४ |
| **मालमत्तेचे वर्णन** |
| स्थावर मालमत्तेचा सर्व तुकडा आणि पार्सल, बेअरींग रो हाऊस / ब्लॉक नं. ५ प्लॉट एरियाचे माप ७३.९० स्क्वे.मी.चे बांधकाम क्षेत्र १८.३४ स्क्वे.मी. सह श्री स्वामी समर्थ रो रेसिडेन्सीचे योग्य रित्या प्लॉट क्रमांकावर बांधण्यात आले होते. प्लॉट क्र. ११ / ३ सर्व्हे नं.७२/५ च्या बाहेर अहमदनगर महानगरपालिका हद्दीत वसलेले आहे. बोल्हेगाव, ता.जि.अ.नगर, ४१४००१ आणि ज्याची सीमा खालीलप्रमाणे आहे – पूर्वेकडे – रस्ता, पश्चिमेकडे – मागील बाजूने प्लॉट मार्जीन, उत्तरेकडे – प्लॉट क्र.६ ते ११/३ (रो हाऊस क्र.६), दक्षिणेकडे – प्लॉट क्र.६ ते ११/३ (रो हाऊस क्रमांक ४) |

विशेषकरून कर्जदार/ जामिनदार/ तारणकर्ता यांना आणि तमाम जनतेला सावध करण्यात येत आहे की त्यांनी उपरोक्त मालमत्तेबाबत व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार उपरनिर्दिष्ट रक्कम तसेच पूर्ण व अंतिम रक्कम प्रदान होईपर्यंत संविदात्मक दराने पुढील व्याज यांसाठी

श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या अधिभाराच्या अधीन असेल. सुरक्षित मत्ता सोडवून घेण्यासाठी, उपलब्ध वेळेच्या संबंधात कायद्याचे कलम १३ च्या उपकलम (८) कडे कर्जदार/ जामिनदार/ तारणकर्ता यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

ठिकाण : अहमदनगर
दिनांक : ३०.०९.२०२४

सही/– प्राधिकृत अधिकारी
श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड


# सेवा संस्था सचिवांना सर्वतोपरी सहकार्य करु परंतु अकार्यक्षमता दाखविणाऱ्यास क्षमा नाही

### जिल्हा बँक संचालक प्रशांत गायकवाड यांची तंबी

नगर – सहकारी संस्थेचा कारभार पारदर्शक व सचोटीने करण्याची जबाबदारी ही सचिवाची असून यासंदर्भात त्याचा हलगर्जीपणा निदर्शनास आल्यास कारवाईला सामोरे जावे लागेल याचे भान ठेवावे व तुमचे वैयक्तिक शासन दरबारी असणारे प्रश्न मार्गी लावण्यास आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही देऊन तुम्ही तुमच्या कामात कार्यक्षमता दाखवा अशी स्पष्टोक्ती राष्ट्रवादीचे अध्यक्ष व अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांनी सेवा संस्थेचे सचिव बँक व सहकार संस्थांचे अधिकारी यांच्या पारनेर येथे घेतलेल्या बैठकीत बोलताना सांगितले

यावेळी संस्था पदाधिकारी व सचिवांना उद्देशून त्यांनी आपापसातील राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी संस्थेच्या प्रगतीच्या दृष्टिकोनातून एकदिलाने काम करावे सत्ताधारी यांनी विरोधकांना विश्वासात घ्यावे व विरोधकांनी विरोधासाठी विरोध न करता विधायक कार्यासाठी पुढे येऊन पुढाकार घ्यावा संस्थेची प्रगती कशी होईल या दृष्टीने सकारात्मक निर्णय घ्यावेत. संस्थेच्या सचिवांनी आपणावर असणारी जबाबदारी कायदेशीर दृष्ट्या पार पाडावी असा सल्लाही गायकवाड यांनी दिला

सेवा संस्थेचे सचिव यांच्या शासनाकडे असणाऱ्या मागण्या मान्य करण्याच्या दृष्टिकोनातून आपण स्वतः प्रयत्नशील असून



सेवा संस्थेचे सचिव व बँक अधिकाऱ्यांच्या बैठकीत बोलताना जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड.

सहकार मंत्री दिलीपराव वळसे पाटील यांच्याशी सचिवांच्या प्रश्नासंदर्भात आपली चर्चा झाली असून मागण्यांचा सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले असल्याचे सांगितले

अहमदनगर जिल्हा सहकारी बँक सहकारी संस्था, सहकाराची कामधेनू असून बँकेची प्रगती कशी होईल व राज्यात अहमदनगर जिल्हा सहकारी बँक ही अग्रगण्य म्हणून तिचं नाव लौकिक कायमस्वरूपी रहावा या दृष्टीने सर्वांनीच योगदान द्यावे अशी अपेक्षा यावेळी गायकवाड यांनी व्यक्त केली

अहमदनगर जिल्हा सहाय्यक निबंध गणेश पुरी यांनी बोलताना सांगितले आपण आपल्या कारकिर्दीत काम करत असताना जे अनुभव आले त्या अनुभवाचा सर्वांसाठी मी निश्चितच उपयोग करेल व सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी वैयक्तिक हितसंबंध न जोपासता सचिवांनी तसेच बँक अधिकारी यांनी कर्ज वसुली करताना टाळाटाळ करणाऱ्या सबंधित व्यक्तीविरुद्ध १०१ प्रमाणे नोटीस बजावून कायदेशीर कारवाई करावी यात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कारवाई करू अशी तंबी संबंधित अधिकाऱ्यांना देऊन वसुली संदर्भात काही अडचणी असेल किंवा वसुली अधिकारी यांची संख्या कमी असेल तर ते नेमण्याची व्यवस्था करावी अशी सूचनाही केली

यावेळी शासन नियुक्त जिल्हा समितीच्या सचिव संघटना प्रतिनिधी घोडेचोर यांनी वसुली संदर्भात हलगर्जीपणा न करता यापुढे सर्वांनीच कार्यक्षमपणे व जबाबदारीने कार्य करावे असे सुचविले

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पारनेरचे सहाय्यक निबंध गणेश औटी यांनी संस्थेने कर्ज वसुली देण्यास टाळाटाळ करणाऱ्या कर्जदाराचे कोणाच्याही दबावाला बळी न पडता जनहितार्थ कर्जदार शेतकऱ्याचे फोटो सहित फ्लेक्स बोर्ड लावावेत व तशी नोटीस प्रसिद्ध करावी असे सुचविले

यावेळी जिल्हा बँकेचे मुख्य कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते तसेच टी डी ओ प्रभाकर लाळगे यांनीही आभार मानले.

# नगरमध्ये ६ ऑक्टोबरला शिक्षकांचा भारत भूषण सन्मान सोहळा व चर्चासत्र

चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलचा उपक्रम

नगर – आयडीवायएम फाऊंडेशनच्यावतीने आणि चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलच्या पुढाकारातून नगरमध्ये ६ ऑक्टोबर रोजी भारत भूषण सन्मान २०२४ आणि एज्युकेशन लिडर्स चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हॉटेल अक्षय पॅलेस येथे सकाळी ९ वाजता या कार्यक्रमास सुरुवात होणार आहे. नगरमधील सीबीएसई शाळांच्या ‘सहोदया’ संघटनेच्या सहकार्याने हा विशेष कार्यक्रम होत असून यात शाळांचे मुख्याध्यापकांना भारत भूषण सन्मानाने गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती आयडीवायएमे रवीशंकर यांनी दिली.

अशोक सचदेव यांनी सांगितले की, शिक्षक हा समाज घडवणारा असतो. त्यांच्या प्रयत्नातूनच उच्च शिक्षित, सुसंस्कारीत पिढी घडत असते. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतानाच त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी हा विशेष सन्मान कार्यक्रम घेण्यात येत आहे. यानिमित्त शिक्षण संस्था चालकांचे विशेष चर्चासत्रही होणार आहे. यात फायनान्शिअल लिटरसी, एसक्यु, ईक्यु आणि आयक्यू संदर्भात विचार मंथन होईल.

शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देणारे शिक्षण तज्ज्ञ नवनवीन संकल्पना, शिक्षण पध्दती, अध्यापन पध्दती विषयी मार्गदर्शन करतील. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सेक्रेटरी न्यायाधीश भाग्यश्री पाटील, प्रा. डॉ. पी.के. राजपूत, सुमित अरोरा, पद्मश्री पोपटराव पवार आदी यावेळी मार्गदर्शन करणार आहेत.

विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि काळानुरुप आधुनिक शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या मंडळींच्या नाविन्यपूर्ण संकल्पना, विचारही या कार्यक्रमात मांडण्यात येणार आहेत. या उपक्रमासाठी एज्युड्रोण, आविसन पब्लिकेशन यांचेही विशेष सहकार्य लाभले आहे.

नगरमध्ये चांगल्या शिक्षणाच्या संधी वाढत आहे. शैक्षणिक क्षेत्र विस्तारत आहे. आताच्या काळातील आव्हानांना सक्षमपणे तोंड देणारे विद्यार्थी घडवणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने सर्व संस्थाचालक, शिक्षक, शैक्षणिक तज्ज्ञ यांनी एकत्र येवून व्हिजन मांडावे या उद्देशाने हा कार्यक्रम होत असून जास्तीत जास्त शिक्षण संस्था प्रतिनिधींनी यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




शिर्डी येथे बँकिंग पुरस्कार स्वीकारताना अशोक सहकारी बँकेचे व्हा.चेअरमन भाऊसाहेब हळनोर व संचालक.

# अशोक सहकारी बँकेला दोन पुरस्कार प्रदान

श्रीरामपूर – अशोक उद्योग समूहाचे सूत्रधार माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या अधिपत्याखालील अशोक सहकारी बँकेला सन २०२३–२४ या वर्षासाठी अहमदनगर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या वतीने उत्कृष्ट कामकाज करून एनपीएचे प्रमाण कमी केल्याबद्दल बीआयएनजीएस पुरस्कार, तर बँकेच्या कार्यक्षम प्रशासनाबद्दल दुसरा पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराचे वितरण शिर्डी येथे असोसिएशनचे अध्यक्ष सत्येन मुंदडा तसेच मालपाणी उद्योग समूहाचे प्रमुख राजेश मालपाणी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

सदर पुरस्काराचे वितरण शिर्डी येथे साई थिम पार्क या ठिकाणी झाले. पुरस्कार स्वीकारण्यासाठी बँकेचे व्हाईस चेअरमन भाऊसाहेब हळनोर, संचालक ॲड. उमेश लटमाळे, व्यवस्थापक प्रदिप थोरात, उपव्यवस्थापक विजय राठोड आदि उपस्थित होते.

याप्रसंगी बँकेच्या कामकाजाबद्दल असोसिएशनने कौतुक केले.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



आयुष्य हा एक बाजार आहे. त्यात प्रेमाची देवाण–घेवाण करावी लागते.

तात्पर्य : बाजारात ज्याप्रमाणे आपणास हवी असणारी वस्तू आपण मोल देऊन ती विकत घेतो, त्यासाठी वस्तू अगर पैशाची देवाण–घेवाण करावी लागते, म्हणजे तेथे दिल्याशिवाय मिळत नाही. त्याप्रमाणे आपण जर इतरांशी प्रेमाने वागलो, तर दुसरीही आपणांशी प्रेमाने वागतात. त्यामुळे सुखी जीवन बनते.

## दिनविशेष ०४ऑक्टोबर२०२४

१८२२ : 'रुदरफोर्ड हेस' – अमेरिकेचे १९ वे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू : १७ जानेवारी १८९३)

१८८४ : 'रामचंद्र शुक्ला' – भारतीय इतिहासकार आणि लेखक यांचा जन्म. (मृत्यू : २ फेब्रुवारी १९४१)

१९१३ : 'सरस्वतीबाई राणे' – शास्त्रीय गायिका यांचा जन्म. (मृत्यू : १० ऑक्टोबर २००६)

१९१३ : 'मार्टिअल सेलेस्टीन' – हैती देशाचे पहिले पंतप्रधान यांचा जन्म. (मृत्यू : ४ फेब्रुवारी २०११)

१९१४ : 'म. वा. धोंड' – मराठी समीक्षक यांचा जन्म.

१९१६ : 'धनसुखलाल तुलसीदास लाकडावाला' – अर्थशास्त्रज्ञ व प्राध्यापक यांचा जन्म.

१९२८ : 'ऑल्विन टॉफलर' – अमेरिकन पत्रकार व लेखक यांचा जन्म.

१९३५ : 'अरुण सरनाईक' – मराठी चित्रपट व नाट्य अभिनेते, तबलावादक, गायक आणि हार्मोनियमवादक यांचा जन्म. (मृत्यू : २१ जून १९८४)

१९३७ : 'जॅकी कॉलिन्स' – इंग्लिश लेखिका व अभिनेत्री यांचा जन्म.

१९९७ : 'ऋषभ पंत' भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्म.

वरीलप्रमाणे ४ ऑक्टोबर दिनविशेष ४`लींलशी वळर्पीळीहशीह

४ ऑक्टोबर दिनविशेष – मृत्यू :

१६६९ : 'रेंब्राँ' – डच चित्रकार यांचे निधन. (जन्म : (जन्म : १५ जुलै १६०६)

१८४७ : 'राजे प्रतापसिंह भोसले' – महाराष्ट्रातील प्रजाहितदक्ष राजे यांचे निधन. (जन्म : १८ जानेवारी १७९३)

१९०४ : 'फ्रेडेरीक ऑगस्टे बर्थोल्ड' – स्टॅच्यू ऑफ लिबर्टी चे रचनाकर यांचे निधन. (जन्म : २ ऑगस्ट १८३४)

१९२१ : 'केशवराव भोसले' – गायक, नट यांचे निधन. (जन्म : ९ ऑगस्ट १८९०)

१९४७ : 'मॅक्स प्लँक' – नोबेल पारितोषिक विजेते जर्मन भौतिकशास्त्रज्ञ यांचे निधन. (जन्म : २३ एप्रिल १८५८)

१९६६ : 'अनंत अंतरकर' – सत्यकथा चे संपादक यांचे निधन. (जन्म : १ डिसेंबर १९११)

१९८२ : 'सोपानदेव चौधरी' – मराठी कवी यांचे निधन. (जन्म : १६ ऑक्टोबर १९०७)

१९८९ : 'पं. राम मराठे' – संगीतकार, गायक व नट संगीतभूषण यांचे निधन. (जन्म : २३ ऑक्टोबर १९२४)

१९९३ : 'जॉन कावस' – अभिनेते यांचे निधन.

२००२ : 'भाई भगत' – वृत्तपट निवेदक यांचे निधन.

२०१५ : 'एडिडा नागेश्वर राव' – भारतीय दिग्दर्शक आणि निर्माता यांचे निधन. (जन्म : २४ एप्रिल १९३४)

## टिप्स

- बोन चायनाच्या भांड्यावरील डाग काढण्यासाठी नेल पॉलिश रीमूव्हरचा उपयोग करता येईल.
- फरशीवर चिकटलेल्या च्युइंग गमचे डाग काढण्यासाठी केरोसीनचा वापर करा.
- कुकरमध्ये पदार्थ शिजवताना त्यात लिंबू/लिंबाची साल टाकून ठेवावी. कुकर आतून चकचकीत होतो.
- दुधीभोपळ्याचा रस १ चमचा, ४–५ थेंब लिंबाचा रस, थोडं मध घेऊन मिश्रण चेहऱ्याला लावावे. १०–१५ मिनिटांनी पाण्याने धुवावा. चेहरा तजेलदार दिसतो.
- मुगाच्या डाळीचं पीठ, टोमॅटोचा रस मिक्स करुन चेहऱ्याला लावावे. १५–२० मिनिटांनी धुवावे.
- झेंडूची फुलं दुधात बारीक वाटून रात्री लावल्यास चेहऱ्यावरील डाग जाण्यास मदत होते.
- देवावर वाहिलेले जास्वंदाची फुलं, दुर्वा दह्यात वाटून पेस्ट करावी. त्वचेला लावल्यास त्वचा उजळते. हिवाळ्याचा त्रास जाणवत नाही.

## विरंगुळा

पद्धतः बाजुला दिलेल्या असंबद्ध शब्दामधून एक अर्थपूर्ण शब्द तयार होतो तो चौकटीत लिहा व ⬤ मध्ये लिहिल्या गेलेल्या शब्दातून एक शब्द तयार होतो त्या शब्दाच्या सहाय्याने दिलेले अर्धवट वाक्य पूर्ण करा.

ज ा र म ा ा त

म ा ा अ म त ा र

र ग अ ं ा ी क

त ट प ा स


हे मुळीच विसरु नका ⬤⬤⬤⬤ करुणा अन् दयेच्या धारामध्ये अवगाहन करुनच निष्कलंक होवू शकेल.

| | | | |
|---|---|---|---|
| वा | रि | रा | शी |
| अ | न | मो | ल |

| | | | |
|---|---|---|---|
| आ | म्र | पा | ली |
| दा | वे | दा | र |

मागील उत्तर : पालवावे

## शब्दरंजन



### आडवे संकेत

१) रमणीय, सुंदर
४) पचविण्याचे कार्य
८) निर्मळ, शुद्ध
९) नाथ आडनाव असलेला एक सिनेकलाकार.
११) चंचल
१३) अव्वाच्या सव्वा भावात
१५) विचार, शोध
१७) टणक, मजबूत
१८) शीतज्वर
२०) यास नेणे म्हणजे धसास लावणे होय.
२१) एका दिशेचे नाव
२३) शुभलक्षणी
२७) मास विकणारा
२८) सृष्टी, विश्व
२९) इंग्रजी चाबी
३०) जिवापेक्षा जास्त
३२) तेज, चकाकी
३३) पापिष्टांची शिक्षा भोगण्याचे स्थळ
३४) एकांकी राहणारा
३९) पातळ, गोळा
४०) जाणाऱ्या येणाऱ्यांची वरदळ इ. मुळे होणारी झीज
४१) होम हवन, पुजा
४२) मुकाबला, लढत
४३) होडी, नौका
४४) एका हिरोचे नाव
४५) राक्षस
४६) आई
४७) सर्प
४८) शंभर
४९) लाजणे
५०) आश्रयास, रक्षणकर्ता

### उभे संकेत

१) लग्न न झालेला
२) फजिती, हुर्यो
३) राजाची आई
४) धर, सांडस
५) नाकात घालावण्याचा अलंकार
६) याचना करणारा
७) पावसाची सर
१०) स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच हे ठणकावून सांगणारे
१२) पडशाळा
१४) एक फळ
१६) व्याजासह १९) शुभ
२२) फांदी, अंग
२४) उलटा जय
२५) भुतकाळ
२६) सत्यानाश करणे, बिघडविणे
३०) वस्तु ठेवण्याचे ठिकाण
३१) दिवस
३४) प्रत्येक पक्षाचा अकरावा दिवस
३५) सीतेचे पुत्र
३६) तीळ परतून, कुटुन व साखर घालून केलेले चुर्ण
३७) द्विदल धान्याचे सुटे कण
३८) अग्निदेवता ४१) मृत्यूदेवता
४२) हळू–हळू ४४) निजणे, शय्या
४५) दटावणे, दाबणे
४६) कंस कृष्णाचा कोण?
४७) दाम दंड भेद

### कालचे उत्तर







१) खाली काही शब्दसमुद व प्रत्येक शब्दसमुहाखाली प्रत्येकी चार पर्यायी शब्द दिलेले आहेत दिलेल्या पर्यायी शब्दामधून प्रत्येक शब्दसमुहाचा अर्थ स्पष्ट करणारा शब्द निवडा?

१) मुळातच सुंदर असलेले
अ)निसर्ग सुंदर ब)अनुपण क)अलौकिक ड) अवर्णणीय

२) तीन बाजूंनी पाणी असलेला प्रदेश?
अ)संगम ब)द्विपकल्प क)खाडी ड)बेट

३) घोडे बांधण्याची जागा?
अ)पांजरपोळ ब)तबादखाना क)पागा ड)गोठा

४) सांगीतले तेवढेच काम करणारा?
अ)सांगकाम्या ब)कामसू क)हरकाम्या ड)रामागडी

५) ज्याची किंमत होऊ शकणार नाही असे?
अ)महाग ब)बिनमोल क)बहुमोल ड)अनमोल

६) नशीबावर भरवसा ठेवणारा?
अ)दैवज्ञ ब)दैवी क)दैववादी ड)अस्तीक

७) नवीन मतांचा पुरस्कार करणारा?
अ)नवमतवादी ब)सुधारणावादी क)प्रतिगामी ड)अधोगामी

८) दोन नद्यांमधील प्रदेश?
अ)खाडी ब)संगम क)दुआब ड)त्रिभुज प्रदेश

९) हळुहळु होत जाणारे बदल?
अ)उत्क्रांती ब)प्रतिक्रांती क)सुधारणा ड)क्रांती

१०) शिघ्रतेने व अकस्मात घळून आलेले बदल?
अ)उत्क्रांती ब)प्रतिक्रांती क)अतिक्रांती ड)क्रांती

११) प्रगतीसाठी धडपळणारा?
अ)महत्त्वकांक्षी ब)होतकरु क)प्रगत ड)उद्योगी

१२) चारही वेदांमध्ये पारंगत असलेला?
अ)चतुर्वेदी ब)महर्षी क)बहुश्रुत ड)ब्रम्हर्शी

१३) नाणी पाडण्याचा कारखाना?
अ)प्रयोगशाळा ब)नाणेनिधी क)नाणेबाजार ड)टाकसाळ

१४) संसाराचा त्याग केलेला?
अ)संन्यासी ब)संत क)ब्रम्हचारी ड)महात्मा

१५) ज्याने खुप काही श्रवण केले आणि त्यामुळे खुप काही माहिती आहे असा? अ)विद्वान ब)बहुश्रूत क)बहुभाषी ड)देवर्षी

१६) गावाचे प्रवेश द्वार? अ)पाणंद ब)गावकूस क)वेस ड)चावळी

१७) धर्मार्थ मोफत जेवन वाटणे?
अ)खानावळ ब)भिक्षागृह क)धर्मशाळा ड)अन्नशत्र

१८) निराश्रीत मुलांचा सांभाळ करणारी संस्था?
अ)आश्रम शाळा ब)अनाथ आश्रम क)बालसुधारगृह ड)धर्मशाळा

१९) एकाच काळात होऊन गेलेले?
अ)समानधर्मी ब)ऐतिहासिक क)समकालीन ड)घनिष्ठ मित्र

२०) ज्याच्या सारखा दुसरा कोणी नाही असा?
अ)अतिंद्रीय ब)अद्वितीय क)अनाकलनीय ड)अजिंक्य

२१) युगप्रवर्तन करणारा?
अ)युगांतक ब)युगांत क) युगप्रवर्तक ड)दिग्गज

२२) मागील कालखंडाचा धावता आढावा घेणे?
अ)पश्चिमाभीमुखन ब)पुच्छावलोकन
क)सिंहावलोकन ड)अधावलोकन

२३) स्वतःशीच केलेले भाषण?
अ)संभाषण ब)स्वगत क)चिंतन ड)स्वभाषण

२४) निरर्थक गोष्टी वा गप्पा?
अ)दंतकथा ब)भाकडकथा क)लघुकथा ड)नवकथा

२५) कधीही नष्ट न होणारे?
अ)विनाशी ब)अनिष्ट क)शाश्वत ड)अशाश्वत

२६) वाकळे पाऊल पडणे?
अ)वाट चुकणे ब)दुर्वतण घडणे
क)सरळ न चालणे ड)भलत्याच ठिकाणी पोहोचणे


२७) विडा उचलणे?
अ)भरपूर जेवण होणे ब)उपाशी राहणे
क)प्रतिज्ञा करणे ड)विडा खाणे


२८) षट्‌ करणी होणे?
अ)सहा जणांनी मिळून ठरविणे ब)सहा जणांना माहित होण
क)तीन जणांना माहित होणेड)गुप्त गोष्ट अनेकांना माहित होण

२९) केसाने गळा कापणे?
अ)मोठी चूक होणे ब)दुर्दैव पुढे येणे
क)विश्वास घात करणे ड)छोट्या साधणाने मोठे काम करणे

उत्तरः (१–अ), (२–ब), (३–क), (४–अ), (५–ड), (६–क), (७–अ), (८–क ), (९–अ), (१०–ड),(११–ब), (१२–अ), (१३–ड ), (१४–अ), (१५–ब), (१६–क), (१७–ड), (१८–ब), (१९–क ), (२०–ब ),(२१–क),(२२–क),(२३–ब),(२४–ब),(२५–क),(२६–ब ), (२७–क ), (२८–ड), (२९– क),

## फिल्मीरंजन





### आडवे संकेत

१) सडक चित्रपटात महाराणा कोणत्या नायकाचे नाव होते
६) सन १९९४ मध्ये आलेला सोनाली बेंद्रेचा पहिला चित्रपट.
७) सन २००२ मध्ये आलेला लाल सलाम चित्रपटाचा नायक.
८) सन १९९९ मध्ये इंद्रकुमार दिग्दर्शीत आमीर खान आणि मनिषा कोईरालाचा एक चित्रपट.
९) हिंदुस्थानी (चित्रपट)
१०) इना मिना डिका चित्रपटाची नायीका.
१३) सन १९८३ मध्ये बृज दिग्दर्शीत या चित्रपटात शत्रुघ्न सिन्हा आणि हेमामालिनी होते.
१५) सन १९९५ मध्ये जय प्रकाश दिग्दर्शीत ऋषी कपूर, तब्बु आणि रविना टंडनचा एक चित्रपट.
१९) सन १९८७ मध्ये मेहुल कुमार दिग्दर्शीत या चित्रपटात गोविंदा आणि फराह होते.
२०) सन १९९० मध्ये इंद्रकुमार दिग्दर्शीत आमिर खान आणि माधूरी दीक्षीतचा चित्रपट.
२२) अजय देवगन आणि काजोलचा एक चित्रपट.
२३) सन १९८४ मध्ये के. बापैय्या दिग्दर्शीत राजेश खन्ना आणि श्रीदेवीचा एक चित्रपट.
२६) सन १९७६ मध्ये नरेंद्र बेदी दिग्दर्शीत या चित्रपटात राजेश खन्ना आणि नितू सिंह होते.
२७) कर दी आपने (चित्रपट)
२८) सन १९७३ मध्ये यश चोपडा दिग्दर्शीत या चित्रपटात राजेश खन्ना आणि शर्मिला टैगोर होते.
२९) सन १९९१ मध्ये भरत कपूर दिग्दर्शीत गोविंदा आणि सोनमचा एक चित्रपट.
३०) सन १९९० मध्ये राकेश रोशन दिग्दर्शीत या चित्रपटात अनिल कपूर, माधूरी दीक्षीत आणि शिल्पा शिरोडकर होते.

### उभे संकेत

१) डफलीवाले डफली बजा मेरे घुंगरु.... या गाण्याचा चित्रपट.
२) सन २००१ मध्ये शशीलाल नायर दिग्दर्शीत शाहरुख खान आणि जुही चावलाचा एक चित्रपट.
३) आफताब शिवदासानी आणि उर्मिलाचा एक चित्रपट.
४) सन २००० मध्ये राजकुमार संतोषी दिग्दर्शीत या चित्रपटात अनिल कपूर, माधूरी दीक्षीत आणि नम्रता होते.
५) सन १९९२ मध्ये कै. बापैया दिग्दर्शीत या चित्रपटात ऋषी कपूर आणि निलम होते. ६) सन १९९९ मध्ये या चित्रपटात अक्षय कुमार, माधूरी दीक्षीत आणि सैफ अली खान होते.
७) सन १९९३ मध्ये अजीज सेजावल दिग्दर्शीत या चित्रपटात जैकी श्रॉफ आणि दिव्या भारती होते.
११) ऋषी कपूर, जेबा आणि अश्विनी भावेचा चित्रपट.
१२) सुनील दत्त दिग्दर्शीत या चित्रपटात संजय दत्त, रिना रॉय होते.
१३) बदन (चित्रपट)
१४) सन १९७५ मध्ये यश चोपडा दिग्दर्शीत अमिताभ बचन, परविन बॉबी आणि शशी कपूरचा चित्रपट.
१६) सन १९७३ मध्ये आलेला अमिताभ, सीमी ग्रवालचा चित्रपट.
१७) सन १९९८ मध्ये हमीद अली दिग्दर्शीत या चित्रपटात फराज खान आणि रानी मुखर्जी होते.
१८) और अप्सरा (चित्रपट)
१९) सन १९९१ मध्ये आलेला डिम्पल कपाडिया, धर्मेंद्रचा चित्रपट.
२१) सन १९७२ मध्ये रामानंद सागर दिग्दर्शीत राजेंद्रकुमार, माला सिन्हाचा एक चित्रपट. २४) नंबरी (चित्रपट)
२५) सन १९८२ मध्ये देव आनंद दिग्दर्शीत या चित्रपटात जैकी श्रॉफ होता.
२६) या चित्रपटात अमिताभ बच्चनचा ट्रिपल रोल होता.

### मागील फिल्मी उत्तर



## 'सिद्धार्थ वाणी'



उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

बाविसाव्या श्लोकात अध्यात्मिक योगी कविश्रींनी भगवान आदिनाथांना अलौकिक प्रकाश वाहक असे संबोधून त्यांचे तिहेरी अस्तित्व मान्य केले आहे. २३ व्या श्लोकात प्रज्ञानिधी आचार्यश्रींनी 'त्वम' या शब्दाची प्रशंसा केली आहे. सामान्यतः 'भवांतम्' म्हणजे 'तुम्ही' हे शब्द आदराचे लक्षण मानले जाते. आपल्यापेक्षा जुने आणि चांगले, म्हणजे आपण, आपल्याला म्हटले जात नाही.

कोत्वम त्वाकरी ही एका मोठ्या थोराची मुलगी होती. तिला कोणी 'तू' किंवा 'तुम' म्हटले तर ती रागावून भांडण (भांडू) लागली, त्यामुळे त्यांचे त्वाकारी हे नाव प्रसिद्ध झाले. आपल्यापेक्षा मोठ्या माणसाला 'त्वम' म्हणजे त्याचा अनादर आहे, पण भक्त देवाला 'त्वम' म्हणू शकतो. भक्त जेव्हा भक्तीमय मनाने भगवंताच्या भक्तीत तल्लीन होतो, तेव्हा 'तुम' हा शब्दही प्रिय आणि हृदय पिळवटून टाकणारा वाटतो. भक्त हा देवापेक्षा मोठा मानला जातो.

असे म्हणतात की, पृथ्वी सर्वात मोठी आहे. महासागर पृथ्वीपेक्षा मोठा आहे. आकाश समुद्रापेक्षा मोठे आहे हे देव आकाशापेक्षा मोठे आहे. कारण त्यात संपूर्ण आकाश आहे. मग विचारले की, विश्वात देव सर्वात मोठा आहे का? उत्तर मिळाले 'नाही'. भक्त हा भगवंतापेक्षा मोठा असतो. कारण त्याच्या छोट्या हृदयातही देव सामावलेला असतो. भक्त हनुमानाने आपल्या हृदयात राम आणि सीतेचे दर्शन दिले. भक्त हनुमानाला श्रीरामापेक्षा जास्त मान्यता आहे, म्हणूनच असे म्हणतात, जे भक्त तुम्हाला योग्य पद्धतीने स्वीकारतात, ते मृत्यूवरही विजय मिळवतात.

मुनाय म्हणजे ऋषी. ऋषी या शब्दाचे अनेक व्युत्पन्न अर्थ आहेत. जसे की, ''मौनिनाह मुनिह जी मौन आहे'', ''मुनायतिति मुनिह मानवते इति मुनि'. अथव मननत मुनिह. जे चिंतनाने ज्ञानाच्या सामर्थ्याचे आहेत, अशा ऋषींचा समूह ओ, भगवंत! २४ व्या श्लोकात १४ भक्तिपुष्प अर्पण केले आहेत. ऋषीचा असा विश्वास आहे की एकही क्रियापद सर्वव्यापी श्रद्धेला सूचित करते. ''हे प्रभु, तुम्ही बाह्य आणि आंतरिक दोन्ही दृष्टी पुरुष आहेत. जंयती मरण हे प्रभू! जो भक्त तुम्हाला उपलब्ध होतो, तो मृत्यूवरही विजय कसा मिळवायचा हे जाणतो आणि मग त्यावर विजय मिळवतो. उत्तराध्यायन सूत्राच्या दुसऱ्या अभ्यासात परिष विजेता ठरला.

नचा, जिचा, म्हणजेच आधी ऐका मग जाणून घ्या आणि मग जगा. अशा प्रकारे मृत्यूचा विजय झाला. मृत्युंजयी मंत्र केल्याने मृत्यूवर विजय मिळत नाही. हे ज्ञान जे नश्वर आहे, तेव्हाच मरते जेव्हा आत्म्याचे अमरत्व अनुभवले जाते. अमर आत्मा तीन वेळाही मरत नाही. जो भगवंताला जीवनाचे परम स्थान आपल्या हृदयात देतो. त्याला मृत्यूची भीती वाटत नाही. अरिहंत सिद्ध किंवा ऋषींचा आश्रय स्वीकारणारा पंडित समाधिभावात मरण पावतो.

तुझा बलवान प्रताप, तू तुझे शरीर बदलले आहेस. ज्याने सर्व भौतिक-भावनिक बंधने उघडली आहेत, असे आदिनाथ प्रभू खूप खूप नमस्कार कौतुक.

*** गाथा * (२३)**

**त्वामामजन्ति मुनया परम पुत्रांस**
**मादित्यवर्णममलं तमसः पुरस्तात ।**
**त्वामेव सम्यगुपलभ्य जयन्ति मृत्युं**
**नान्य शिवः शिवपदस्य मुनीन्द्र! पन्था ।।२३।।**

*** अर्थ- ***

हे मुनीश्वर! ऋषी तुला महापुरुष सूर्यासारखे तेजस्वी शुद्ध आसक्ती आणि द्वेष इत्यादीपासून मुक्त आणि अज्ञानाच्या अंधकारापासून मुक्त मानतात. जे शुद्ध अंतःकरणाने तुझी उपासना करतात ते मृत्यूवर विजय मिळवतात, म्हणून तुझ्याशिवाय मोक्षाचा दुसरा हितकारक मार्ग दाखविणारा दुसरा कोणी नाही.

**- सौ. सविता चोरडिया**


# केडगाव, बुऱ्हाणनगर मंदिर परिसरात 'सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसह' 'ड्रोन'ची नजर

### दोन्ही ठिकाणी विधिवत घटस्थापना; पहिल्याच दिवसापासून भाविकांची दर्शनासाठी गर्दी

नगर - केडगाव उपनगरातील रेणुका माता मंदिर व बुऱ्हाणनगर येथील तुळजाभवानी देवी मंदिरात शारदीय नवरात्रौत्सवास सुरुवात झाली असून दोन्ही ठिकाणी गुरुवारी (दि.३) विधिवत घटस्थापना, महापूजा व ध्वजपूजन करण्यात आले.नवरात्रौत्सवानिमित्त ३ ते १२ ऑक्टोबरदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्याच दिवसापासून दोन्ही ठिकाणी दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती.

मागील वर्षी दोन्ही मंदिरात सुमारे अडीच लाख भाविकांनी दर्शन घेतले होते. यंदा ही संख्या ३ ते सव्वा तीन लाखांवर जाण्याचा अंदाज मंदिर व्यवस्थापनाने वर्तवला आहे. भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर परिसरात ५० सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह २ ड्रोनद्वारे नजर असेल. तसेच केडगाव येथे कोतवाली पोलिसांचा व बुऱ्हाणनगर येथे भिंगार कॅम्प पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.

नवरात्र उत्सवानिमित्त केडगाव येथील श्री रेणुका माता मंदिरात ओंकार दिलीप सातपुते यांच्या हस्ते घटस्थापना करण्यात आली. यावेळी त्यांची पत्नी धनश्री सातपुते, दिलीप सातपुते, भाविक भक्त व पुजारी उपस्थित होते. तर बुऱ्हाणनगर येथील श्री तुळजाभवानी मंदिर येथे पुजारी ॲड. विजय भगत यांच्या हस्ते महापूजा करून घटस्थापना करण्यात आली. यावेळी सुभाष भगत, ॲड.अभिषेक भगत, कुणाल भगत, संकेत भगत आदी उपस्थित होते



बुऱ्हाणनगर येथील श्री तुळजाभवानी मंदिर येथे पुजारी ॲड. विजय भगत यांच्याहस्ते महापूजा करून घटस्थापना करण्यात आली. यावेळी उपस्थित सुभाष भगत, ॲड.अभिषेक भगत, कुणाल भगत, संकेत भगत आदी.



केडगावच्या श्री रेणुका माता मंदिरात ओंकार दिलीप सातपुते यांच्या हस्ते घटस्थापना करण्यात आली. यावेळी धनश्री सातपुते, दिलीप सातपुते, भाविक व पुजारी. (छाया - लहू दळवी)

नगर शहर, भिंगार, सावेडी उपनगरासह जिल्हाभरातून लाखो भाविक नवरात्रीच्या काळात केडगाव व बुऱ्हाणनगरला दर्शनासाठी येतात. नवरात्रौत्सव काळात या मंदिरांमध्ये दर्शनासाठी पायी येणाऱ्या भाविकांची संख्याही मोठी असते. उत्सव काळात या दोन्ही ठिकाणी मोठी यात्रा भरते. या दृष्टिकोनातून मंदिर व्यवस्थापनाकडून उपाययोजना करण्यात आल्या आहेत. बुऱ्हाणनगर येथील मंदिरात शनिवारी (दि.५ ऑक्टोबर) पहाटे तिसऱ्या माळेला तुळजापूर येथे जाणारी पालखी येणार आहे. देवीच्या मंदिराला या पालखीच्या पाच प्रदक्षिणा होतील. या दिवशी गावात मोठी यात्रा भरते. केडगाव येथील मंदिरातही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या ठिकाणी सातव्या माळेला मोठी यात्रा भरणार आहे.

### विविध प्रकारचे दोनशेहून अधिक स्टॉल

नवरात्रौत्सव काळात केडगाव देवी मंदीर परिसरात सुमारे शंभर ते दीडशे स्टॉल लावले आहेत. बुऱ्हाणनगर देवी मंदिर परिसरात ७० ते ८० स्टॉल लावले आहेत. पूजा साहित्य, हार फुले यासह खेळणी, इतर वस्तू व खाद्य पदार्थ स्टॉल मोठ्या प्रमाणात लावले आहेत. यात्रेच्या पार्श्वभूमीवर लहान मुलांसाठी मनोरंजन नगरी उभारली आहे.

## अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवून नेणाऱ्या आरोपीला पकडले

नगर - माळीवाडा परिसरातील हायस्कूल मध्ये शिक्षण घेणाऱ्या १४ वर्षीय मुलीला हायस्कूलच्या आवारातून फूस लावून पळवून नेणाऱ्या तरुणाला कोतवाली पोलिसांनी राहुरी बसस्थानकात पकडले आहे. त्याच्या ताब्यातून त्या अल्पवयीन मुलीची सुटका करण्यात आली आहे. ओम गोपी झेंडे ऊर्फ ओमकार गायकवाड (वय १९, रा. अचानक चाळ, रेल्वे स्टेशन अहमदनगर) असे या आरोपीचे नाव आहे.

पळवून नेण्याची ही घटना २६ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या कालावधीत माळीवाडा परिसरात घडली होती. पिडीत मुलीचे वडील रिक्षाचालक असून त्यांनी सकाळी ११ च्या सुमारास मुलीला रिक्षातून हायस्कूल बाहेर सोडले होते. त्यांना दुपारी त्यांच्या पत्नीचा फोन आला की, शाळेतून फोन आला होता, आपली मुलगी शाळेत गेलेली नाही. त्यानंतर त्यांनी तातडीने शाळेत जावून चौकशी केली. शाळेच्या आसपासच्या परिसरात तसेच रहाते घराचे आसपासचे परिसरात मुलीचा शोध घेतला तसेच नातेवाईक व मित्र परीवार यांचे कडे चौकशी केली असता मुलगी मिळुन आली नाही. व ती घरी परत आली नाही. त्यामुळे तिला कुणीतरी फूस लावून पळवून नेल्याची फिर्याद त्यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात दिली होती. या फिर्यादी वरून अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन पो.नि. प्रताप दराडे यांनी तात्काळ गुन्हे शोध पथकास सदर गुन्हयाबाबत माहिती देवुन आरोपी व अपहरीत मुलीचा शोध घेण्यासाठी रवाना केले. या गुन्ह्याचा बारकाईने तपास करताना सदर मुलगी व तिला पळवून नेणारा तरुण राहुरी बसस्थानक परिसरात असल्याची माहिती पथकाला मिळाली. त्यामुळे पथकाने तातडीने राहुरी येथे धाव घेत दोघांना ताब्यात घेतले. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक कैलास कपिले हे करत आहेत. ही कारवाई पो.नि. प्रताप दराडे यांचे मार्गदर्शना खाली महिला स.पो.नि योगिता कोकाटे, उपनिरीक्षक कैलास कपिले, गुन्हे शोध पथकाचे महिला पो.हे.कॉ. रोहिणी दरंदले, पो.हे.कॉ. योगेश भिंगारदिवे, विशाल दळवी, सलीम शेख, सुर्यकांत डाके, पो.कॉ. अमोल गाढे, अभय कदम, कुणाल खरात, सतीश शिंदे, अतुल काजळे व दक्षिण मोबाईल सेल चे पो.कॉ. राहुल गुंडू यांनी केली आहे.

## नगर शहर व परिसरात जोरदार पाऊस

नगर - नवरात्रौत्सवाच्या पूर्वसंध्येला शहर व परिसरात विजांच्या कडकडाटांसह परतीचा पावसाने जोरदार हजेरी लावली. बुधवारी (दि.२) रात्री ७.१५ वाजता शहरात पावसाला सुरुवात झाली. रात्री ८.१६ वाजेपर्यंत पावसाचा जोर कायम होता. शहरात झालेल्या पावसामुळे विविध भागात नवरात्र उत्सवाची तयारी करणाऱ्या मंडळांच्या कार्यकर्त्यांची धांदल उडाली. दरम्यान, या पावसामुळे खोदून ठेवलेल्या रस्त्यावरून जाताना वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागली. दरम्यान, पुढचे तीन दिवस जिल्ह्यात हलक्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

शहरासह जिल्ह्यात गेल्या आठवड्यात परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावली होती. गेल्या पाच दिवसांपासून पावसाचा जोर काहीसा कमी झाला होता. बुधवारी रात्री मात्र पुन्हा पावसाला सुरुवात झाली. बुधवारी रात्री ७.१५ वाजेपासून सुरु झालेला पाऊस रात्री ८.१६ वाजेपर्यंत सुरूच होता. सुमारे तासभर चाललेल्या या पावसामुळे शहरातील सखल भागात पाणी साचले होते. या पावसामुळे शहरातील दिल्ली गेट, माळीवाडा, सर्जेपुरा, प्रोफेसर कॉलनी, मध्यनगरासह उपनगरातील रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. त्यामुळे ठिकठिकाणी वाहतूक कोंडी झाल्याचे दिसून आले. नवरात्रोत्सवाला गुरुवारपासून सुरुवात झाली आहे. त्याच्या पूर्वसंध्येलाच नगर शहर व परिसरात हा परतीचा पाऊस झाल्याने नवरात्र उत्सवाची तयारी करणाऱ्या शहरातील विविध देवी मंडळांच्या कार्यकर्त्यांची मात्र धांदल उडाली.

## पार्किंगमधून दुचाकीची चोरी; गुन्हा दाखल

नगर - हॉटेलमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने हॉटेलच्या पार्किंगमध्ये लावलेली होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल (क्र. एम.एच.१६ बीटी ३९२९) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना टिळक रोडवरील नंदनवन हॉटेल येथे घडली आहे. याबाबत पप्पू विलास साबळे (रा. हरीमळा, सोलापूर रोड) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी साबळे हे हॉटेल नंदनवन येथे कामावर आलेले असताना त्यांनी हॉटेलच्या पार्किंगमध्ये त्यांची मोटारसायकल लावलेली होती. ती अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## नवीन होमगार्ड सदस्य नोंदणीत पात्र उमेदवारांनी ४ ऑक्टोबर रोजी कागदपत्रांसह उपस्थित राहावे

नगर - जिल्हा होमगार्डमधील नवीन होमगार्ड सदस्य नोंदणीची तात्पुरत्या अंतिम यादीतील अहमदनगर तालुका पथकामधील लक्षसंख्येमध्ये अंशतः बदल करुन सुधारित तात्पुरती अंतिम यादी अहमदनगर जिल्हा होमगार्ड कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे. नोंदणीमध्ये पात्र उमेदवांरानी ४ ऑक्टोबरला सकाळी १० वा. जिल्हा होमगार्ड कार्यालय, सिद्धी बागेजवळ वैद्यकीय प्रमाणपत्र, नोंदणीच्या वेळी दिलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रतींसह उपस्थित राहावे. जे उमेदवार उपस्थित राहणार नाहीत त्यांचे नाव पात्रता निवड यादीतून कमी करण्यात येईल, असे जिल्हा समादेशक होमगार्ड तथा अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांनी कळविले आहे.

# सावेडी नाट्यगृहाच्या बंद पडलेल्या कामाचे ठिकाण बनले तळीरामांचा अड्डा

### दारू, बियरच्या बाटल्यांचा खच

नगर - निधी उपलब्ध असून, कोट्यावधी रुपये खर्च करून देखील सावेडी नाट्यगृह उभारणीचे काम गेल्या अनेक वर्षांपासून कधी सुरू होते तर ते लगेच बंद पडते. तब्बल एक दशकापासून हे काम रखडलेले आहे. याबाबत शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने प्रत्यक्ष इन कॅमेरा पाहणी करत सोशल मीडियातून लाईव्ह पोलखोल केली आहे. विविध ब्रँडच्या दारू, बियर, सोडा वॉटरच्या बाटल्या, सिगरेटची पाकीटं, माव्याच्या पुड्या यांचा अक्षरशः खच त्या ठिकाणी आढळून आला आहे. हा तळीरामांचा अड्डा बनला आहे.




गेल्या मोठ्या कालावधीपासून सावेडी नाट्यगृहाचे काम निधी असून देखील रखडले आहे. मात्र हे ठिकाण आता तळीरामांचा अड्डा बनले आहे. या ठिकाणी दारू, बियर, सोडा वॉटरच्या बाटल्यांचा खच पडला आहे. किरण काळे यांनी सोशल मीडियाद्वारे याची लाईव्ह पोलखोल केली.

काँग्रेसकडून शहरभर पोस्टरबाजी करत सुरू असणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या 'जुन्या विश्वासाच्या' दाव्याचा पोलखोल सप्ताह राबविला जात आहे. यावेळी बोलताना काळे म्हणाले की, नाट्य, संगीत, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील कलावंत, नाट्य रसिक आणि तमाम नगरकरांसाठी ही संतापजनक बाब आहे. मनपा, राज्य आणि देशात यांची एक हाती सत्ता असताना साधं मनपाच्या स्वमालकीचे नाट्यगृह हे उभारू शकत नसतील तर नगरकरच आता येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा सत्तेच्या शिखरावरून कडेलोट करतील, असा घाणाघात काळे यांनी केला आहे.

काळे पुढे म्हणाले, सन २०११ मध्ये पहिल्या दोन कोटींचा निधी शासनाने दिला. त्यानंतर महाविकास आघाडी सरकारने २०२० मध्ये पाच कोटी दिले. हे पैसे शासनाचे, जनतेचे आहेत. पण सत्ताधारी असा डींडोरा वाजत आहेत की जणू काही यांच्या स्वतःच्याच खिशातून ते खर्च करत आहेत. हा निधी मनपाकडे पडून आहे. परंतु यांनी मोठ्या टक्केवारीची मागणी केल्यामुळे ठेकेदाराने काम अर्धवट सोडले होते. दुर्दैवाने त्या ठेकेदाराच्या निधनानंतर झाले. मनपाने नवीन टेंडर काढले आहे. मात्र त्याची साधी वर्क ऑर्डर देखील अजून दिलेली नाही. हे काम निधी आल्यापासून दीड, दोन वर्षातच पूर्ण व्हायला हवे होते. मात्र टक्केवारीला कंटाळून ठेकेदार पळून गेल्याचा आरोप काळेंनी केला आहे.

### चार महिन्यात गाळे उभे राहिले, नाट्यगृह १० वर्ष का रखडले?

सावेडी नाट्यगृह ही शहराच्या वैभवात भर घालणारी वास्तू होती. सुंदर वास्तु उभी राहण्यापूर्वीच या वास्तूच्या दर्शनी भागासमोरच अति जलद अशा विक्रमी चारच महिन्याच्या काळात गाळे उभारले गेले. मात्र मनपाने दर्शनी भागच झाकून टाकत या वास्तूची वाट लावली. सत्ताधाऱ्यांचेच बगलबच्चे याचे लाभार्थी आहेत. चार महिन्यात गाळे उभे केले, मात्र दहा वर्षात यांना साधे नाट्यगृह का उभारता आले नाही, असा सवाल काळे यांनी उपस्थित केला आहे.

### नाट्यगृहाच्या जागेच यांनी डंप यार्ड केलं

मनपा आणि स्वयंघोषित कार्यसम्राटांच्या नावाने सोशल फाउंडेशनच्या गाड्या शहरभर स्वच्छता मोहीम राबवत असल्याचा दिखावा सुरु आहे. प्रत्यक्षात या मनपाच्या स्वमालकीच्या जागेत कचरा, घाणीचे साम्राज्य आहे. जागोजागी गवत उगवले आहे. यातून डेंग्यू, साथीचे आजार पसरत नाहीत का ? शहरातील कचरा गोळा करून या जागेचे डंप यार्ड केले गेले आहे. ही अत्यंत शरमेची गोष्ट आहे.

### नगर मनपाचा रसिक, कलावंतांना ठेंगा

पुण्यामध्ये मनपाच्या मालकीचे बालगंधर्व, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अशी स्वतःची नाट्यगृह आहेत. मात्र इतक्या वर्षांमध्ये मनपाचे स्वमालकीचे एकही नाट्यगृह या शहरात नसावा ही लाजिरवाणी गोष्ट आहे. नगर शहरामध्ये यामुळे व्यावसायिक नाटक आणण्याचं कोणताही ऑर्गनायझर धाडस करू शकत नाही. सहकार सभागृह आणि त्याचे संलग्न खर्च एवढे मोठे आहेत की प्रयोग तिकीट विक्री करून हाउसफुल्ल झाला तरी देखील ऑर्गनायझरला परवडत नाही. माऊली सभागृहामुळे सावेडी उपनगरात थोड्या प्रमाणात का होईना पण दिलासाजनक स्थिती आहे. मात्र आसन क्षमता मर्यादित असल्यामुळे तिथे व्यावसायिक नाटकांचे अर्थकारण कोलमडते. त्यामुळे या शहरातील रसिकांची सांस्कृतिक भूक भागेल अशी कोणतीच व्यवस्था सत्ताधारी उभी करण्यामध्ये पूर्णतः अपयशी ठरले असल्याची खंत काळे यांनी व्यक्त केली आहे.

### सत्ताधाऱ्यांची आंदोलन, फोटोसेशनची नौटंकी

विद्यमान सत्ताधाऱ्यांनी स्वतः अनेक वेळा कामाची पाहणी केली. एक पाहणी कलाकारां समवेत घेऊन केली. आश्वासने दिली. आंदोलन, फोटोसेशनची नौटंकी केली. आठ दिवसात काम सुरू करा नाहीतर आम्ही तीव्र आंदोलन छेडू, उपोषण करू अशा वल्गना केल्या. तर दुसरीकडे टक्केवारीसाठी ठेकेदाराचा जाच केला. म्हणून हे काम रखडल्याचा गंभीर आरोप काळे यांनी केला आहे.

### कलावंतांच्या आंदोलनाला केराची टोपली

सर्वच क्षेत्रातील कलावंतांनी देखील यासाठी अनेक वेळा आंदोलनं केली. दहा वर्षांपूर्वी कलाकारांनी तत्कालीन मनपा आयुक्त यांना नाट्य परिषदेच्या वतीने सर्जेपुरा रंगभवनचे वाडिया पार्क करू नका असे लेखी निवेदन दिले होते. शहराच्या मध्यवर्ती भागातील नागरिकांना रंगभवनच्या माध्यमातून कार्यक्रमांची मेजवानी मिळू शकली असती. मात्र त्या जागेत मनपाने साफसफाई करून पे अँड पार्कच्या धर्तीवर पार्किंग सुरू करण्याचा घाट घातला होता. पण तो कलावंतांनीच हाणून पाडला. अजूनही रंगभवन उभे राहू शकलेले नाही. नाट्यगृहाच्या जागेवर पूर्वी क्रीडा संकुल होते. त्याचा काही काळ ओपन थिएटर म्हणून देखील सांस्कृतिक कार्यक्रमासाठी उपयोग होत होता. कोट्यावधी रुपयांचा खर्च करून उभारलेले ते संकुल देखील नेहरू मार्केट प्रमाणे पाडल्याचे काळे यांनी म्हटले आहे.

### शहराला वैभवशाली परंपरा

नगर शहराच्या वैभवशाली सांस्कृतिक परंपरेचा गौरव करताना काळे म्हणाले की, सुप्रसिद्ध हिंदी - मराठी सिने, नाट्य अभिनेते सदाशिव अमरापूरकर, शाहू मोडक, मधुकर तोरडमल, तर अगदी अलीकडच्या मिलिंद शिंदे, बोक्या सातबंडे या व्यावसायिक लोकप्रिय असणाऱ्या बाल रंगभूमीवरील नाटकातील चिमुकला आरूष बेडेकर अशी मोठी परंपरा आहे. गायिका अंजली, नंदिनी गायकवाड, पवन नाईक अशी सांगितिक क्षेत्रातील अनेक नावाजलेले कलावंत देखील शहरात आहेत. तसेच अनेक राष्ट्रीय पुरस्कार विजेते लेखक, दिग्दर्शक या मातीत आहेत. राज्य नाट्य स्पर्धा नगरचे कलावंत दरवर्षी राज्याभर गाजवतात. मात्र मनपाची सांस्कृतिक क्षेत्राबद्दल असणारी अनास्था आणि त्याला न मिळणारा राजश्रय यामुळे शहराचे सांस्कृतिक वैभव धुळीला मिळण्याची दुर्दैवी वेळ आली आली असल्याची खंत काळे यांनी यावेळी व्यक्त केले.

### सत्तेच्या चाव्या हाती आल्यास रखडलेली कामे आम्ही पूर्ण करू

मी स्वतः संगीताचा विद्यार्थी आहे. भविष्यात जर नगरकरांनी सत्तेच्या चाव्या काँग्रेसकडे दिल्या तर आम्हाला विश्वास आहे की शहराच्या सांस्कृतिक प्रगतीसाठी भरीव निधी आणून जलद गतीने दर्जेदार कामे करू, अशी ग्वाही यावेळी काळे यांनी दिली आहे. या पोलखोल मोहिमेत मनोज गुंदेचा, संजय झिंजे, अनिस चूडीवाला, विलास उबाळे, अभिनय गायकवाड, इंजि. सुजित क्षेत्रे, माजी नगरसेवक फैयाज केबलवाला, युवकचे शम्स खान, चंद्रकांत उजागरे, आर.आर.पाटील, राहुल सावंत, ॲड. अजित वाडेकर, मुस्तफा खान, महिलाच्या उषा भगत, शैला लांडे, डॉ. जाहिदा शेख, मीनाज सय्यद, शंकर आव्हाड, सुफियान रंगरेज, गौरव घोरपडे, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, गणेश आपरे, आनंद जवंजाळ, अशोक जावळे वाढदिवसाच्या कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# अशोक सहकारी बँकेची तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रगतीपथाकडे वाटचाल



भानुदास मुरकुटे

नगर - अशोक सहकारी बँकेची वाटचाल आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रगतीपथाकडे सुरू आहे. बँकेने नुकतीच क्यूआर कोड सुविधा सुरू केलेली असून या सुविधेमुळे बँकेच्या खातेदारांना बँकेत थेट पैसे भरणे सोयीस्कर झालेले असून त्यांना बँकेत समक्ष जाण्याची आवश्यकता नाही. सध्या या सुविधेचा लाभ बँकेच्या खातेदारांना मोठ्या प्रमाणावर होत आहे. याबरोबरच अशोक बँक थोड्याच दिवसांत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून इंटरनेट बँकिंग तसेच फोन बँकिंगमध्ये फोन पे, गुगल पे अशा आधुनिक सुविधा खातेदारांना उपलब्ध करून देणार आहे. त्यामुळे बँकेच्या खातेदारांना त्यांच्या खात्यातून पैसे काढणे अथवा अन्य ठिकाणी पैसे पाठविणे सोयीस्कर होणार असून या सुविधांमुळे बँकेच्या खातेदारांना बँकेत समक्ष जाण्याची आवश्यकता पडणार नाही, अशी माहिती अशोक बँकेचे संस्थापक तथा चार्टर्ड अकौंटंट माजी आमदार भानुदास मुरकुटे यांनी दिली.

अशोक सहकारी बँकेची सन २०२३-२४ ची वार्षिक सर्वसाधारण सभा ३० सप्टेंबर रोजी बँकेचे चेअरमन ॲड. सुभाष चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली अहमदनगर येथे झाली, याप्रसंगी श्री. मुरकुटे बोलत होते.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप थोरात यांनी बँकेला सन २०२३-२४ या वर्षामध्ये एकूण ढोबळ नफा ७ कोटी ७२ लाख रुपये झाला असून आयकर २ कोटी ७४ लाख भरला आहे. घसारा ७१ लाख, थकित कर्ज तरतूद ५० लाख, ठेव विमा हप्ता ५८ लाख अशा सर्व तरतुदी वजा जाता ताळेबंदाला निव्वळ नफा ३ कोटी १९ लाख रुपये झाला आहे, असे ते म्हणाले.

३१ मार्च २०२४ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रुपये ४९५ कोटी असून कर्ज वाटप ३४० कोटी तर खेळते भांडवल ५६३ कोटी आहे. तसेच रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे सर्व निकष पूर्ण केल्यामुळे बँकेला ऑडिट वर्ग 'अ' मिळाला आहे. बँकेच्या सध्या १३ शाखा कार्यान्वित असून दोन स्वमालकीची एटीएम आहेत. बँकेच्या संचालक मंडळात चार्टर्ड अकौंटंट, वकील, व्यापारी तसेच व्यावसायिकांचा समावेश आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बँकेने नेट एनपीएचे प्रमाण ५ टक्क्यांच्या आत राखले आहे, अशी माहिती बँकेचे चेअरमन ॲड. सुभाष चौधरी यांनी दिली.

सदर सभेसाठी बँकेचे व्हाईस चेअरमन भाऊसाहेब हळनोर, सभासद, संचालक मंडळ, बँकेचे अधिकारी उपस्थित होते. सदर सभेचे कामकाज खेळीमेळीत पार पडले.

